www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

दै.युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग
खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर,
अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर
प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 190 वा बुधवार दि. 26 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

द•ख•ल

## हरिचंद्र शिंदे यांना शिक्षकी सेवा समाप्ती दिनाच्या शुभेच्छा - संजय काळंगे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



नुकतेच हरिचंद्र शिंदे सर यांची सेवा समाप्ती झाली कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथील शाळेत कार्यरत होते .आपल्या दीर्घ आणि समर्पित सेवेमुळे आपण शिक्षण क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त केले आहे. आपल्या कठोर परिश्रमाने आणि समर्पणाने अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवले. आपल्या कार्यामुळेच आपला प्रभाव शालेय आणि शैक्षणिक संस्थांच्या पलीकडे देखील उमठला आहे. भविष्याच्या कार्यांमध्येही आपलले मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळो, अशी संजय किसन काळंगे यांनी इच्छा व्यक्त केली !हरिचंद्र शिंदे यांना शिक्षकी सेवा समाप्ती दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देत पुढील आयुष्य निरोगी व आनंदीमय जावो अश्या शुभेच्छा संजय काळंगे यांनी दिल्या

## "रानमेवा" या कविता संग्रहाचे प्रकाशन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तलवाडा ता.सिल्लोड येथील शेतकरी कुटुंबातील कवी रमेश वाढेकर शेत परिसरात गाय, म्हशी जनावरे वळतावळता त्यांनी "रानमेवा" या कविता संग्रह पुस्तक लिहून काढले या "रानमेवा" या कविता संग्रह पुस्तकाचे प्रकाशन डॉ.ललित अधाने,डॉ.सरदारसिंग बैनाडे,लेखाधिकारी शरद भिंगारे, सुखदेव आहेर यांच्या हस्ते तलवाडा ता.सिल्लोड येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात सोमवारी करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी कविता संग्रहाचे समीक्षण करून काव्यसंग्रहाचे भरभरून कौतुक केले. या प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष शशिकांत सावंत हे होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी विष्णु वाढेकर,बाळकृष्ण खरात, ज्ञानेश्वर दौंगे यांनी सहकार्य केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.सुधीर भोसले यांनी केले.कार्यक्रमासाठी ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## एसटी डेपो नांदेड आगाराला मिळाल्या पाच नवीन लालपरी बसेस
### आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांनी पूजन करून केले मार्गास्त

**दैनिक युवक आधार**

**नांदेड -** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगाराला एसटी महामंडळाकडून पुणे दापोडी येथील रा.प.म. कार्यशाळेतून अशोक लेलँड कंपनीच्या नव्या कोऱ्या लालपरी पाच बसेस नुकत्याच प्राप्त झाल्या असून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते या नव्या लालपरी बसेसचे पुजन करून प्रवाशी सेवेमध्ये मार्गास्त करण्यात आले. प्रदुषण कमी करून पर्यावरणाच्या समतोलासाठी यापूर्वी युरो-1, बीएस-2, बीएस-3, बीएस-4 च्या नंतर डायरेक्ट बीएस-6 अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या बनावटीचे 41 सीटर्स_22 असलेल्या या नव्या कोऱ्या लालपरी बसेसमुळे प्रवाशी सेवेमध्ये आरामदायी सुखकर अधिकची भर पडणार असून सध्या या पाच नव्या कोऱ्या लालपरी बसेस कोल्हापूर, नागपूर, शेगाव या मार्गावर धावत आहेत. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक श्रीनिवास रेणके, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजीक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, वाहन परिक्षक नामदेव राठोड, शंकर ढगे, पाळी प्रमुख अविनाश भागवत, चालक प्रकाश पवार, शिफ्टमधील कर्तव्यावर असलेले यांत्रीक स.बचित्तरसिंघ गाडीवाले, गणेश शिंदे, शेख अफजल, सिद्धार्थ जोंधळे, मंगेश कांबळे, मयुर गायकी, पुंड यांची प्रमुख उपस्थिती होती.



# एमपीएससीकडून 'पीएसआय' चा निकाल जाहीर

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**




**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट- ब सेवा मुख्य परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. त्यात अतिश मोरे यांनी सर्वाधिक गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती देण्यात आली. एमपीएससीने पीएसआय संवर्गातील ३७४ पदांसाठी ५ नोव्हेंबर २०२३ रोजी परीक्षा घेतली होती. उमेदवारांचे निकालाकडे लक्ष लागले होते. त्यानुसार एमपीएससीने सर्वसाधारण गुणवत्ता यादी संकेतस्थळावर जाहीर केली. सर्वसाधारण गुणवत्ता यादी उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहे. अंतिम निकालापूर्वी पडताळणी केल्यानंतर काही उमेदवारांच्या शिफारशींमध्ये बदल होऊ शकतो. खेळाडू व अनाथ प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून पडताळणीच्या अधीन राहून त्यांचा प्रवर्गाचा दावा तात्पुरता ग्राह्य धरण्यात आला आहे. त्यानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. सर्वसाधारण

### अतिश मोरे राज्यात प्रथम

गुणवत्ता यादी न्यायालयात दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधिन राहून जाहीर करण्यात येत आहे. उमेदवारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर खेळाडूव अनाथ प्रवर्गातील संवर्गाची तात्पुरती निवड जाहीर होईल. त्यानंतर या परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर अंतिम गुणवत्ता यादीच्या आधारे उमेदवारांची शिफारशी करण्यात येतील, अशी माहिती एमपीएससीकडून देण्यात आली आहे.




## वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नेरेपाडा येथील प्लिझंट इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपली कला-कौशल्य दाखवत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी संस्थेचे चेअरमन धनंजय खुटले, उपाध्यक्ष अनंता गडगे, खजिनदार धनश्री खुटले, महेश पाटील, प्रकाश घाडगे, प्रशांत गांगुर्डे, गोपीनाथ पाटील नेरे, मयूर तांबडे आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, उपस्थित मान्यवर यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच शाळेला नेहमी सहकार्य करणाऱ्या पालक, ग्रामस्थ यांचा यावेळी विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपली कला कौशल्य दाखवली आणि उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमात देशभक्ती, कौटुंबिक मूल्ये, विविधतेतील एकता, प्रेम, सामाजिक संदेश आणि पालकत्व यासारख्या विविध गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्य केले. विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे पाहुण्यांसह उपस्थितानी देखील कौतुक केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध कला संस्कृतीवर नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी विद्यार्थ्यांना मेडल आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले.

## सारिका ताई नागरे म्हणजे समाजाभिमुख नेतृत्व: डॉ रोहला




**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

आजच्या युगात समाज व्यवस्था आणि भारताची संस्कृती जपली जाते आहे ती सारिका ताई नागरे यांच्या सारख्या व्यक्तिंमुळे ही आपल्या सर्वांच्या करता गौरवाची बाब आहे. असे गौरव उदगार विश्व रेकॉर्ड करते डॉ राजेंद्र सानी यांनी व्यक्त केले. दिल्लीस्थित द मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थेच्या वतीने सुवर्ण भरारी भुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सारिका ताई नागरे यांना २२मार्च २०२५रोजी मानद डॉक्टरेट प्रदान करून गौरवण्यात आले त्या प्रसंगी व्यक्त केले. ताईंच्या कार्याचा गौरव करण्याचा मॅजिक बुक संस्थेचा मानस अतिशय अभिनंदनीय आहे. सारिका ताई यांच्या सारख्या समाज सेवकांचे दर्शन जनतेला घडणे ही आनंदाची **पान २ वर**

## वाटा करिअरच्या: योग्य दिशा आणि यशाचा मंत्र

**आसाराम विरकर उपसंपादक,**
**दैनिक युवक, आधार (मराठवाडा आवृत्ती)**

आपल्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे करिअर निवडणे. योग्य करिअर निवडल्यास जीवन सुकर आणि आनंदी होते, तर चुकीची निवड केल्यास पुढील वाटचाल कठीण होऊ शकते. म्हणूनच करिअर निवडताना प्रत्येक टप्प्यावर विचारपूर्वक पावले उचलणे आवश्यक आहे.

**१. आपली आवड ओळखा**

करिअर निवडताना प्रथम आपली आवड, कौशल्ये आणि क्षमता ओळखणे गरजेचे असते. बऱ्याचदा लोक समाज, पालक किंवा मित्रांच्या प्रभावाखाली करिअर निवडतात, मात्र यातून असमाधान आणि अपयश येऊ शकते. आपल्या मनाला काय हवे आहे, कोणत्या क्षेत्रात आपण उत्कृष्ट काम करू शकतो, हे आधी समजून घ्या.

**२. मार्केट आणि संधी यांचा विचार करा**

फक्त आवड असून उपयोग नाही, तर त्या क्षेत्रातील संधी आणि स्पर्धेचाही अभ्यास



करावा. सध्या कोणत्या क्षेत्रांना जास्त मागणी आहे? भविष्यात कोणते क्षेत्र वाढणार आहे? हे समजून घेतल्यास आपली करिअर निवड अधिक मजबूत होईल.

**३. योग्य शिक्षण आणि कौशल्य विकास**

ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे, त्यासाठी आवश्यक शिक्षण घ्या. आजच्या डिजिटल युगात डिग्रीसोबतच व्यावसायिक कौशल्येही महत्त्वाची आहेत. नवीन तंत्रज्ञान, प्रमाणपत्रे, ऑनलाईन कोर्सेस आणि इंटर्नशिपच्या माध्यमातून स्वतःला अपडेट ठेवा.

**४. मार्गदर्शन आणि नेटवर्किंग**

योग्य मार्गदर्शन आणि चांगले प्रोफेशनल नेटवर्क हे करिअरमध्ये पुढे जाण्यास मदत करतात. अनुभवी लोकांकडून मार्गदर्शन घ्या, त्यांच्यासोबत संवाद साधा **पान २ वर**

# चतुरागिणी संस्थेतर्फे महिला दिनानिमित्त 'चतुरास्त्र चतुरा' पुरस्कार वितरण आणि आरोग्य जनजागृती सत्र..!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**

**मुंबई,** २२ मार्च २०२५: महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी चतुरागिणी या प्रतिष्ठित संस्थेतर्फे महिला दिनाचे औचित्य साधून 'चतुरास्त्र चतुरा' पुरस्कार सोहळा आणि आरोग्य जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. हा खास कार्यक्रम नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये शनिवार, २२ मार्च रोजी



उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचा उद्देश महिलांनी विविध क्षेत्रांत केलेल्या कार्याचा सन्मान करण्याबरोबरच आरोग्याविषयी जनजागृती करणे हा होता. यासाठी चतुरागिणी संस्थेने सामाजिक, शिक्षण, कला, क्रीडा, आरोग्य, उद्योग, साहित्य, अध्यात्म, राजकारण अशा अनेक क्षेत्रांतील महिलांकडून त्यांच्या योगदानाची ओळख करून देणारी व्हिडिओज मागवली होती. या स्पर्धात्मक प्रक्रियेतून निवड झालेल्या महिलांना 'चतुरास्त्र चतुरा' पुरस्काराने **पान २ वर**

## आय.टी.आय निदेशक संघटनेच्या नाशिक विभाग अध्यक्षपदी जालिंदर खाकाळ यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील रहिवासी असले मा.श्री. जालिंदर एकनाथराव खाकाळ सर यांची महाराष्ट्र राज्य आयटीआय संघटनेच्या नाशिक विभागाच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक सर्वत्र अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेचे अधिवेशन नुकतेच सातारा येथे संपन्न झाले या अधिवेशनादरम्यान महाराष्ट्र राज्य आयटीआय निदेशक संघटनेचे राज्य कार्यकारणी व सहा विभागीय कार्यकारणीच्या संघटनात्मक निवडणूका संपन्न झाल्या. या निवडणुकीमध्ये नाशिक विभागाच्या अध्यक्षपदी अंभोरा येथील रहिवासी असलेले व सध्या अहिल्यानगर येथे स्थायिक असलेले जालिंदर एकनाथ खकाळ हे निवडून आले. निदेशक प्रशिक्षणार्थी यांच्या अडचणीचा बारकाईने अभ्यास व प्रश्नांची जाण असणारे नेतृत्व या पदावर बसल्याने निर्देशकांचे अनेक प्रश्न मार्गी लागतील असा



विश्वास निदेशक बंधू व्यक्त करीत आहेत महाराष्ट्र राज्य निदेशक नाशिक विभागाचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जालिंदर खाकाळ यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे खरंतर सरांचं जीवन प्रवास पाहिला तर, खडतरच म्हणावं लागेल. वडील शेतकरी , कौटुंबिक आर्थिक परिस्थिती जेमतेम, अशा कठीण काळात अंभोऱ्यासारख्या ग्रामीण खेडेगावातून 80 च्या दशकात शिक्षणाची वाट धरत , अनेक आव्हाने, संघर्ष पायदळी तुडवत आशाकांक्षाचे स्वप्न उराशी बाळगून परिस्थितीत दोन हात करत लढत राहिले. दुष्काळी कोरडवाहू शेतीत राबणाऱ्या काबाडकष्ट करणाऱ्या, वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून , जिद्द, चिकट आणि परिश्रमाच्या बळावरती यशाला गवसणी घालून , शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून रुजू झाले. कुटुंबात अक्षरशा परिवर्तनाची नवी नांदी आली. आणि आर्थिक उन्नतीचा, साक्षरतेचा सूर्य उगवला. वडिलांच्या परिश्रमाचे संस्कारांचे अखेर चीज करण्याचे काम खाकाळ सर यांनी आपल्या कृतीतून करून दाखवलं. खऱ्या अर्थाने सरांच्या आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरुवात येथून झाली. सरांच्या जीवनाला खऱ्या अर्थाने कलाटणी मिळाली. या सर्व परिस्थितीची जाणीव ठेवत, अनेक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना घडवण्याचं काम त्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून केल. नोकरी करत असताना त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे सेवाभाव जपण्याचं काम केलं. शेतकरी कुटुंबातील मुलांनी अवगत केलेल्या कलेतून नोकरी, तसेच छोट्या-मोठ्या उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी झाल पाहिजेत हा प्रामाणिक प्रयत्न करत राहिले.

याच कार्याची पोचपावती म्हणून आज त्यांना नाशिक विभागाची जबाबदारी त्यांना संघटनेच्या माध्यमातून मिळाली आहे. या मिळालेल्या संधीचं सोनं करत, शिक्षकांच्या असणाऱ्या विविध समस्या सोडवत त्यांना न्याय देण्याचं काम कराल या सदिच्छा व पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी तुम्हांला खूप खूप शुभेच्छा

## छत्रपतीचा आवमान करणाऱ्या प्रशांत कोरटकर याला 3 दिवसाची पोलीस कोठडी



**दैनिक युवक आधार**
**कोल्हापूर वार्ताहर**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करून इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकावणाऱ्या प्रशांत कोरटकरला न्यायालयाने तीन दिवस पोलिस कोठडी सुनावली.

तेलंगातून ताब्यात घेतल्यानंतर कोरटकरला घेऊन पोलिसांचे पथक आज, मंगळवारी सकाळी कोल्हापुरात पोचले.

**यानंतर त्याला** न्यायालयात हजर केले असता २८ मार्च पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

प्रशांत कोरटकर याला जुना राजवाडा पोलिसांच्या पथकाने काल, सोमवारी दुपारी तेलंगणातून अटक केली.

**रात्रभर प्रवास** करून आज, मंगळवारी सकाळच्या सुमारास पोलिसांचे पथक कोल्हापुरात पोहोचले.

**यावेळी जुना** राजवाडा पोलीस ठाण्यासह कसबा बावडा येथील जिल्हा न्याय तंत्रज्ञानात पोलीस बंदोबस्त तैनात केला आला होता.

# वाटा करिअरच्या: योग्य दिशा आणि यशाचा मंत्र

**पान १ वरुन** आणि शक्य तितक्या नेटवर्किंग संधी साधा.

**५. स्टार्टअप आणि स्वावलंबन**

आजची तरुणाई नोकरीपेक्षा व्यवसायाकडे वळत आहे. स्टार्टअप्स, फ्रीलान्सिंग, डिजिटल मार्केटिंग, आणि विविध ऑनलाईन व्यवसाय यामुळे आर्थिक स्थैर्य मिळू शकते. त्यामुळे करिअरचा विचार करताना व्यवसायाच्या संधींकडेही लक्ष द्या.

**६. सातत्य आणि प्रयत्नांची तयारी ठेवा**

यश पटकावण्यासाठी सातत्य आणि चिकाटी गरजेची आहे. सुरुवातीला अपयश आले तरी हार मानू नका. प्रत्येक अपयशातून शिकून पुढे जाणे हाच खरा यशाचा मार्ग आहे.७. संतुलन राखा

करिअर करताना वैयक्तिक आयुष्य आणि प्रोफेशनल आयुष्य यामध्ये समतोल राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मानसिक आणि शारीरिक आरोग्याची काळजी घ्या, कारण निरोगी मन आणि शरीर असल्याशिवाय यश टिकवणे अवघड जाते.

निष्कर्ष

करिअर हा आयुष्यातील एक महत्त्वाचा निर्णय असतो. योग्य दिशा, सातत्य, मेहनत, आणि स्मार्ट वर्क याच्या मदतीने आपण यशस्वी होऊ शकतो. आपल्या आवडीनुसार आणि काळाची गरज लक्षात घेऊन करिअर निवडल्यास यश निश्चितच आहे. "वाटा कितीही कठीण असू द्या, जर दिशाच योग्य असेल तर ध्येय गाठणे सहज शक्य आहे!"

# केएलई कॉलेजमध्ये पार पडला न्याय वितरण प्रणालीवर आंतरराष्ट्रीय परिसंवाद

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कळंबोली येथील केएलई कॉलेज ऑफ लॉ ने २४ मार्च रोजी सार्क देशांमध्ये न्याय वितरण प्रणालीवर आंतरराष्ट्रीय परिसंवाद यशस्वीरित्या आयोजित केला. या परिसंवादात सार्क राष्ट्रांच्या न्याय व्यवस्थेतील कायदेशीर चौकटी, आव्हाने आणि सुधारणा यावर चर्चा करण्यासाठी प्रख्यात कायदेतज्ज्ञांना एकत्र आणण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट ज्ञानाची देवाणघेवाण वाढवणे आणि प्रादेशिक कायदेशीर सहकार्य आणि न्यायालयीन कार्यक्षमता सुधारण्यावर चर्चांना प्रोत्साहन देणे होते. या परिसंवादाचे प्रमुख




पाहुणे श्रीलंकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश एएचएमडी नवाज होते. प्रो. (डॉ.) आर. वेंकटराव, कुलगुरू आणि प्रो. (डॉ.) गिगीमॉन व्हीएस, संचालक, एमिटी लॉ स्कूल होते. या सत्राचे अध्यक्षपद केएलई कॉलेज ऑफ लॉचे प्राचार्य प्रो. (डॉ.) दिनकर गिट्टे यांनी भूषवले. प्रा. (डॉ.) गिगिमॉन व्ही.एस. यांनी आपल्या भाषणात जिल्हा आणि तालुका स्तरावरील न्यायालयांपासून न्यायदान प्रणाली सुरू होते यावर भर दिला आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात शैक्षणिक संस्थांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. त्यांनी मुट कोर्ट, इंटर्नशिप, पर्यायी वाद निवारण आणि विद्यार्थ्यांना खटल्यांसाठी तयार करण्यासाठी इतर क्लिनिकल कायदेशीर प्रशिक्षणाचे महत्त्व सांगितले. न्यायमूर्ती ए.एच.एम. नवाज यांनी त्यांच्या प्रसिद्ध ईस्टर संडे जजमेंटवर विचारमंथन केले, जे त्यांनी संपूर्णपणे लिहिले होते. त्यांनी भारतीय आणि श्रीलंकेच्या संविधानांमधील मूलभूत हक्कांच्या तरतुदींमधील समानता लक्षात घेतली. प्रा. आर. वेंकटराव यांनी त्यांच्या भाषणात आंतरराष्ट्रीय परिसंवादाच्या विषयाचे महत्त्व अधोरेखित केले आणि सार्कच्या संदर्भात केएलई कॉलेज ऑफ लॉ, नवी मुंबईने उचललेले पहिले पाऊल मानले. परिसंवादाचा समारोप एका संवादात्मक प्रश्नोत्तर सत्राने झाला, जिथे विद्यार्थ्यांनी न्यायिक अकार्यक्षमता, सीमापार कायदेशीर सहकार्य आणि न्याय सुधारणांमध्ये कायदेशीर शिक्षणाची भूमिका यावर पॅनेलच्या सदस्यांशी संवाद साधला.

# लासलगाव- विंचूर ट्रक द्राक्ष बागेत गेल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान

**दैनिक युवक आदर**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



**विंचूर :-** आज दिनांक 25/03/2025 दुपारी दीडच्या सुमारास लासलगाव कडून विंचूर कडे जाणाऱ्या सोळा टायर असलेला ट्रक क्रमांक एम एच 15-jw-6044 या लासलगाव कडून विंचूर कडे येणारा ट्रक हा जनार्दन स्वामी आश्रम विंचूर च्या समोरील द्राक्ष बागेत भरधाव वेगाने घुसला गाडीचा वेग इतका होता की गाडी रोडवरून खाली उतरून द्राक्ष बागेचे लोखंडी अँगल तार या सर्व गोष्टींना धडकवात व भुईसपाट करत साधारण 100 ते 125 फूट आत मध्ये घुसला व शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिसकावला गेला क्षणात होत्याचे नव्हते झाले. सदर द्राक्ष बाग हा संजय नंदूकांत शेवाळे यांचा असून द्राक्ष हा तोडणीस आलेला होता द्राक्ष हे साधारण दहा ते बारा वर्षाची पीक असून या बागेस आता कुठे चार वर्षे पूर्ण झाले त्यामुळे सुरुवातीच्या काळात नुकसान झाल्याने संजय शेवाळे यांचे खूप मोठे नुकसान झाले आत्ताचे नुकसान बघता दहा ते पंधरा लाखआहे. पुढील दहा वर्षाचा विचार केल्यास काही लाखन लाखात हे नुकसान जाते असे परिसरातील शेतकरी प्रतिनिधी शी चर्चा करताना सांगतात सदर बागेचा व्यवहार हा द्राक्ष व्यापारी सोबत झाला आहे. दोन दिवसात द्राक्ष बघ हा व्यापारी घेऊन जाणार होता अशात ड्रायव्हरच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात झाला तरी शेवाळे यांनी आपले नुकसान भरून मिळाव अशी मागणी परिसरातील शेतकरी व द्राक्ष बाग मालक करत आहेत. सदर ट्रक हा लासलगाव येथील रघुवीर भेळ भत्ता सेंटर श्री शरद संतोष निकम यांचा असून ड्रायव्हरला गाडीवर नियंत्रण न ठेवता आल्यामुळे हा अपघात घडला असे प्रथम दर्शनी नागरिक सां आहे. सदर ट्रक हा लासलगाव येथील रघुवीर भेळ भत्ता सेंटर श्री शरद संतोष निकम यांचा असून ड्रायव्हरला गाडीवर नियंत्रण न ठेवता आल्यामुळे हा अपघात घडला असे प्रथम दर्शनी नागरिक सांगत आहे. सदर अपघातात दोन मोटरसायकल स्वारी बचावले स्वार ही बचावले परत एकदा लासलगाव विंचूर या रस्त्याचे रुंदीकरण व्हावे अशी नागरिक मागणी करत आहे.

# एक मेकांना तुच्छ लेखने ही पशू वृत्ती --- भगवान बाबा आनंदगडकर

**दैनिक युवक आधार**
**अमरावती विभागीय**
**संपादक:-संदीप मापारी (लोणार).**

ईश्वर हा सृष्टीचा निर्माता असल्याने सर्व जण त्याचीच लेकरे आहोत.आपल्याला न कळल्याने भेदाभेदाचे घोटाळे होतात.तेव्हा एक मेकांना तुच्छ लेखने ही पशू वृत्ती आहे .असे प्रतिपादन आनंद गडे चे मठा धीश भगवान बाबा आनंदगडकर यांनी केले.लोणार तालुक्यातील गुंधा येथे क्रांती गुरू लहुजी साळवे स्मृति राज्य स्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संत गजानन महाराज सेवा संघाध्यक्ष हभप नन्हई महाराज यांचे अध्यक्षतेत २२मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता.यावेळी उद्बोधन करताना बोलत होते. सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतीमा पुनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.या वेळी मंचावरील मान्यवरांचा आयोजकांकडून यथोचित सत्कार करण्यात आला. सालाबादाप्रमाने यंदा ही विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा क्रांती गुरू लहुजी साळवे स्मृति राज्य स्तरीय पुरस्कार देऊन भगवान बाबा आनंदगडकर महाराज यांचे हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला.हभप नन्हई महाराज यांचे अध्यक्षीय भाषण झाले.नयन ओव्हर या चिमुकल्याच्या क्रांती गुरू लहुजी साळवे यांच्या वरील व्याख्यानाने उपस्थितांची मने जिंकली.डॉ.अंबादास सगट ,प्रा.धनंजय भिसे, डॉ.सचिन साबळे यांनी मनोगत व्यक्त केले.विठ्ठलराव गिलवरकर यांनी प्रास्ताविकातून पुरस्कार वितरण सोहळ्या चा उद्देश स्पष्ट केला. या वेळी रामदास तुकाराम मापारी यांनी




कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल त्यांना उद्योग रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांच्यासह राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २५ जणांना राज्य स्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मंचावर संदीप मानकर, केशवराव फुके, सरपंच गजानन माने , उपसरपंच गोविंद राऊत, माजी सरपंच अश्रूजी फुके, आयोजक शंकरराव मानवतकर यांची मंचावर उपस्थिती होती.तर ग्रा.पं. सदस्य दीपक मानवतकर, मा.सरपंच पुरुषोत्तम केंद्रे,सुरेश मानवतकर, सोपानराव देबाजे, गजानन गोरे, गजानन शिवराम तिरके,सुधाकर माने, लक्ष्मण महाराज भुजबळ

मुख्याध्यापक दिगंबर ढव्हळे, डॉ. विजू मोरे, जीवन घायाळ, पो.पा.रमेश ओव्हर, बबनराव ओव्हर यांचे सह मान्यवर उपस्थित होते.पुरस्कार वितरण सोहळ्याचे सूत्रसंचालन ज्ञानदेव मानवतकर यांनी तर शंकर मानवतकर यांनी आभार मानले.

# चतुरागिणी संस्थेतर्फे महिला दिनानिमित्त 'चतुरास्त्र चतुरा' पुरस्कार वितरण आणि आरोग्य जनजागृती सत्र..!

**पान १ वरुन** सन्मानित करण्यात आले.

**संचिता सचिन भंडारी यांचा प्लॅटिनम ग्रुपमधून गौरव:**

चतुरागिणी संस्थेच्या या उपक्रमात संचिता सचिन भंडारी यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी 'चतुरास्त्र चतुरा' पुरस्कार जाहीर करण्यात आला. विविध क्षेत्रांतील महिलांनी प्रेक्षकांसमोर आपली प्रेरणादायी कामगिरी उलगडली. कर्जत, अलिबाग, पनवेल, दादर आणि बोरिवली येथून आलेल्या अनेक महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावून हा सोहळा संस्मरणीय बनवला.

**शिल्पा देसाई आणि कोअर टीमचे मोलाचे योगदान:**

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चतुरागिणी संस्थेच्या शिल्पा देसाई आणि त्यांच्या कोअर टीमने खूप मेहनत घेतली. महिलांच्या सशक्तीकरणासाठी नेहमीच सक्रिय असणाऱ्या शिल्पा देसाई यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडला. त्यासोबतच नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टर्सनी आरोग्यविषयक सत्रात उपस्थित महिलांना महत्वपूर्ण आरोग्य सल्ले दिले आणि जीवनशैली सुधारण्याचे मार्गदर्शन केले.

**महिला सशक्तीकरणासाठी पुढील कार्यक्रम आयोजित करण्याची इच्छा:**

कार्यक्रमाच्या शेवटी शिल्पा देसाई यांनी चतुरागिणी संस्थेच्या महिला सदस्यांचे आभार मानत भविष्यातही महिलांसाठी विविध उपक्रम आयोजित करून त्यांना नवनवीन संधी उपलब्ध करून देण्याची इच्छा व्यक्त केली. महिलांनी अशा कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवावी, अशी सदिच्छाही त्यांनी व्यक्त केली.

**चतुरागिणी फेसबुक ग्रुपचा विकास आणि उत्तरोत्तर प्रगती:**

चतुरागिणी फेसबुक ग्रुपच्या माध्यमातूनही महिलांना प्रोत्साहित करण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. या ग्रुपच्या माध्यमातून महिलांना संवाद, मार्गदर्शन, कौशल्यविकास आणि प्रेरणा देणारे अनेक उपक्रम राबवले जात आहेत. या ग्रुपची प्रगती होत राहावी आणि अधिक महिलांनी त्याचा लाभ घ्यावा, अशी अपेक्षा संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाची सांगता एका स्नेहभोजनाने झाली आणि सर्वांनी एकमेकांशी संवाद साधत प्रेरणादायी क्षण अनुभवले. महिलांच्या योगदानाचा गौरव करणारा आणि आरोग्यविषयी महत्त्वपूर्ण माहिती देणारा हा कार्यक्रम उपस्थित महिलांसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरला.

चतुरागिणी संस्थेचा हा उपक्रम महिलांच्या सशक्तीकरणासाठी निश्चितच एक दिशादर्शक पाऊल ठरला आहे.

# सारिका ताई नागरे म्हणजे समाजाभिमुख नेतृत्व: डॉ रोहला

**पान १ वरुन** बाब आहे अश्या कार्यक्रमातून समाजाला प्रेरणा मिळते हे म्हत्वाचे आहे असे विचार व्यक्त करत डॉ सानी यांनी ताईंच्या कार्याचे कौतुक केले. सुवर्ण भरारी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सारिका ताई नागरे यांच्या माध्यमातून यांना समाजातील वंचितांना न्याय नक्की मिळत राहील त्यांचे कार्य जग प्रसिद्ध व्हावे ही सदिच्छा असे म्हणत कार्यक्रमाचे अध्यक्ष पूर्वाश्रमीचे मेवार विद्यापीठाचे संचालक डॉ एस के रोहला यांनी व्यक्त करत सारिका ताईंच्या कार्याचे कौतुक केले. सारिका ताई नागरे गेली अनेक वर्षे समाज जीवनात पूर्ण पणे समरस होऊन समाजातील शोषित, पिडीत, वंचित विशेषत्वाने विधवा महिलांच्या पुनर्वसन कार्यात मोलाचे योगदान देत आहे. निस्वार्थ बुद्धीने आपण समाजाचे काही देणं लागतो या उदात्त विचारांनी त्यांनी या ईश्वरीय कार्यात स्वतःला झोकून देत मोलाचे योगदान दिले आहे. ही कौतुकास्पद गोष्ट आहे याचा आपण गर्व करायला हवा असे त्यांनी पुढे विशद केले. संत नरहरी महाराज आणि पूज्य श्री श्री १००८ महामंडलेश्वर दत्तात्रय महाराज दहीवाळ यांच्या कृपा आशीर्वादाने समाजहिता करता मी स्वतःला एक आंदोलन म्हणून समर्पित करत आहे. या पुढेही समाजाला नेतृत्व देऊन समाज हित जपण्यासाठी समाजातील अन्याय ग्रस्त लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे आणि पुढेही राहील अशी ग्वाही डॉ सारिका ताई नागरे यांनी या प्रसंगी दिली. प्रसिद्ध जादूगार सी पि यादव,विविध राज्यातील संत आणि मॅजिक बुक रेकॉर्डचे परिवार सदस्य या प्रसंगी उपस्थित होते.

# क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती 2025 कार्यकारिणीची घोषणा

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर –**

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती 2025 च्या भव्य आयोजनाच्या तयारीसाठी नियोजन बैठक संपन्न झाली. यामध्ये महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांचा प्रसार आणि जयंती उत्सवाच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी नव्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

यावर्षीच्या जयंती उत्सवात समाजप्रबोधनपर व्याख्यानमाला, विशेष महिला सन्मान सोहळा, भव्य मिरवणूक आणि विविध सामाजिक उपक्रम राबवले जाणार आहेत. या उत्सवात समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग असावा, यासाठी नियोजन समिती व कार्यकारिणी विशेष प्रयत्न करणार आहे.

महत्त्वाचे प्रबोधनात्मक व्याख्यान – दिनांक 10 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता तिरूमला मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आले आहे

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त



विशाल पुंड | बाबुलाल मगर | शैलेश हेकाडे | नितीन पाटील | आसाराम विरकर | सिताराम विधाते | ताराचंद गायकवाड | विलास ढंगारे

दिनांक 10 एप्रिल रोजी सकाळी सुप्रसिद्ध प्रबोधनकार प्रा. श्री. वसंत हंकारे यांचे "न समजलेले मायबाप" या विषयावर हृदयाला पिळून टाकणारे प्रभावी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान विशेषतः शालेय विद्यार्थिनी, विद्यार्थी व महिला भगिनींसाठी असून, समाजातील प्रत्येकाने या अनोख्या प्रबोधनातून जीवनाला दिशा मिळवावी. तरी, सर्व महिला भगिनी, विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रेरणादायी व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे विनम्र आवाहन करण्यात येत आहे.

**कार्यकारिणी – क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव**

**समिती 2025**

**मुख्य मार्गदर्शक**
मा. ना. श्री. अतुलजी सावे साहेब
(कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य)

**संस्थापक अध्यक्ष**
श्री. विशाल बाबासाहेब पुंड

**स्वागताध्यक्ष**
श्री. बाबूलालजी मगर साहेब

**अध्यक्ष**
श्री. शैलेश रमेश हेकाडे

**कार्याध्यक्ष**
श्री. नितीन पाटील

**कोषाध्यक्ष**
श्री. आसाराम विरकर
श्री. सिताराम विधाते

**प्रसिद्धी प्रमुख**
श्री. विलास ढंगारे
श्री. ताराचंद गायकवाड
श्री. भालचंद्र गायकवाड
श्री. राकेश रावळे
श्री. हर्षल राऊत
श्री. ज्ञानेश्वर भोपळे
श्री. उद्धव बळी
श्री. देव राजळे
श्री. लक्ष्मण उगले

**उपाध्यक्ष**
श्री. श्रीकांत घुले
श्री. धीरज केंद्रे
श्री. सचिन जेजुरकर
श्री. कल्याण जाधव
श्री. दिगंबर घाटुळ
श्री. अविनाश उबाळे
श्री. बाळू वाघमारे

**सरचिटणीस**
श्री. अशोक गोरे
श्री. पंडित कांदे
श्री. गोपी विटके
श्री. श्रीकांत भोसले
श्री. आकाश राऊत
श्री. आकाश बसये
श्री. अजय दहिफळे
श्री. संकेत डोईफोडे
श्री. प्रतीक लोखंडे

**सचिव**
श्री. ईश्वर सोनवणे
श्री. दिलीप जायकर
श्री. आनंद घनवट
श्री. शैलेश इंगळे
श्री. तेजस गाजरे
श्री. योगेश पवार
श्री. महेश राऊत
श्री. वैभव भगत
श्री. योगेश जाधव
श्री. अर्जुन कारके
श्री. सुरत डवणे
श्री. पियुष साळवे

**सहसचिव**
श्री. मोहित जाधव
श्री. रोहित गोरे
श्री. दत्ता तारो
श्री. अक्षय मुळे
श्री. सागर शिंगारे
श्री. पवन तांबे
श्री. सुरज राऊत
श्री. गीतेश ससाने
श्री. विजय काळे
श्री. अजिंक्य घोडके
श्री. शशांक जैन
श्री. मयूर रंधे

यावर्षीच्या महात्मा फुले जयंती उत्सवात नव्या उपक्रमांद्वारे समाजप्रबोधनावर भर दिला जाणार आहे. सर्व समाजबांधवांनी या उत्सवात सहभागी होऊन फुले विचारांचा जागर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क:**
**श्री. शैलेश हेकाडे**
**मो. 7588075559**
**अध्यक्ष, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती 2025**

# बोकडवीरा ग्रामपंचायतीवर बोकडवीरा गावातील दिव्यांग बांधवांचे धरणे आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी रणिता ठाकूर**

रायगड जिल्ह्यामधील उरण तालुक्यात असलेल्या बोकडवीरा गावामधील दिव्यांग बांधवांनी त्या गावच्या ग्रामपंचायती समोर २५ मार्च २०२५ रोजी धरणे आंदोलन सकाळी १० वाजल्यापासून केले होते. आज कालच्या महागाईच्या युगात जितका त्रास सामान्य माणसांना जगताना होत आहे. त्याहीपेक्षा दुप्पट त्रास दिव्यांग कुटुंबांना होत आहे. या गावत एकूण २२ दिव्यांग आहेत. ग्रामपंचायतीमार्फत काही कामगारांची भरती होणार होती. त्यामध्ये दिव्यांग बांधवांनाही संधी मिळावी याकरता सदर धरणे आंदोलन पुकारण्यात आले होते. हे आंदोलन करण्यापूर्वी या गावातील दिव्यांग बांधवांनी वेळोवेळी पत्र व्यवहार केला होता. आणि त्यासाठी दिव्यांग सामाजिक संघटना उरण यांनी पाठिंबा दिला होता. वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही ग्रामपंचायतीने हवा तसा प्रतिसाद दिला नाही त्याचमुळे हे धरणे आंदोलन पुकारण्यात आले. या आंदोलनातील दिव्यांगांच्या सक्षमीकरणा करता पुढील प्रमुख मागण्या होत्या,१) आपल्या बोकडविरा ग्रामपंचायत हद्दीतील द्रोणागिरी नोडमध्ये साफसफाई कामगार भरती मध्ये दिव्यांगाना प्राधान्य मिळावे.२)गावातील कमिटीमध्ये गावातील किमान ०१ दिव्यांग बांधवास समावेश करुन घ्यावा. सदर दिव्यांगांकरिता मागण्या करण्यात आल्या होत्या. त्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी बोकडवीरा गावच्या विद्यमान सरपंच मॅडम अपर्णा मनोज पाटील ह्या आल्या होत्या. त्यांनी वरील मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. दिव्यांग बांधवांनी ही सदर मागण्या जर पूर्ण झाल्या नाहीत तर उपोषण करणार आहोत असेही सांगितले. सदर धरणे आंदोलन प्रसंगी बोकडवीरा गावातील सर्व दिव्यांग बांधव. उरण तालुक्यातील दिव्यांग सामाजिक संघटनेचे सर्व पदाधिकारी, त्याचबरोबर गावातील सामाजिक कार्यकर्ते, कॉ भूषण पाटील,कॉ हेमलता पाटील, जयवंत पाटील, कॉ रामचंद्र म्हात्रे,यशवंत ठाकूर, जयवंत पाटील. आणि विद्यमान सरपंच अपर्णा मनोज पाटील या सर्वांच्या उपस्थित सदर धरणे आंदोलन सरपंच मॅडमच्या आश्वासनांनी थांबविण्यात आले. त्याचबरोबर दिव्यांगांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महेंद्र म्हात्रे यांनी ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंच मॅडम, आंदोलनात सहभागी झालेले सर्व सामाजिक कार्यकर्ते, उरण तालुक्यातील दिव्यांग सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, आणि गावच्या सरपंच अपर्णा मनोज पाटील यांचे आभार व्यक्त करत सदर आंदोलन स्थगित करण्यात आले.



# हृदयविकाराने निधन झालेल्या तरुणीच्या दशक्रिया विधीप्रसंगी डॉ.अनिरुद्द धर्माधिकारी यांचे व्याख्यान




**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर :-** टाकळी विंचुर ता.निफाड येथील कल्याणी केशव मोकाटे या २२ वर्षीय युवतीचा हिचा हृद्यविकाराने झोपेत मृत्यू झाला होता. तिच्या दशक्रिया विधीनिमित्त मोकाटे परिवाराने अत्यंत आदर्श व स्तुत्य असा उपक्रम राबवत नाशिक येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉक्टर अनिरुद्ध धर्माधिकारी यांचे 'हृदयाची काळजी घेऊ या' या संबंधित व्याख्यान आयोजित केले होते. टाकळी विंचुर येथील केशवराव मोकाटे यांची कन्या कु.कल्याणी केशवराव मोकाटे हिचा अल्पवयात हृदयविकाराने निधन झाले. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत होती. आपल्यावर हि वेळ आली अशी कुणावरही येऊ नये, असा प्रसंग कोणत्याही कुटुंबावर परत येऊ नये, लोकांना हृद्यविकार व त्याची लक्षणे, घ्यावयाची काळजी याची माहिती व्हावी या हेतूने नाशिक येथील प्रसिद्द हृद्यरोग तज्ञ अनिरुद्द धर्माधिकारी यांची वेळ मिळवत मार्गदर्शन केले. याप्रसंगी लासलगाव डॉक्टर असोसिएशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द • ख • ल

## शिरूरआनतपाळ शहरातील भोजराजनगर जि.प.शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरुर अनंतपाळ :** शहरातील नावाजलेल्या भोजराजनगर येथील जिल्हा परिषद शाळेत वार्षीक स्नेहसम्मेलन उत्साहात पार पाडले. स्नेह सम्मेलनाच्या अध्यक्षपदी सुरेंद्र देवशटवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षणतज्ञ प्रभाकर कुलकर्णी, गटशिक्षणाधिकारी अनिल पागे, नगराध्यक्षा मायावती धुमाळे, नगरसेवक सुधीर लखनगावे, विस्तार अधिकारी विजयकुमार संभाळे, चेअरमन गोविंद हंद्राळे, नगरसेविका कुसूम खरटमोल, अश्विनी लोंढे, शिंदेताई, नाटकरे ताई, सचिन बेंबळगे, खंडू लोहार,संगमेश्वर सांगवे यांची उपस्थीती होती.यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर,मनोरंजनातुन समाजप्रबोधनाचे गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रभाकर कुलकर्णी यानी स्नेहसम्मेलनातुन विद्यार्थ्यांचा शारिरिक, मानसिक, बौध्दीक विकास होतो.कला श्रेत्रातील कलावंताची जडणघडण स्नेहसंमेलनातुच होते असेही त्यानी सांगितले.सुत्रसंचालन रोहित बनसोडे यानी केले .आभार महादेव सुर्यवंशी ,देविदास सांगवे यानी मानले.यावेळी मुख्याध्यापक राजेंद्र मुळखेडे,रोहीदास नाबदे, काशिनाथ उंबरगे यांच्यासह शिक्षक ,पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




## पनवेल शहर पोलिसांकडून दंगा काबू योजनेची रंगीत तालीम



दैनिक युवक आधार
पनवेल, वार्ताहर

आगामी काळातील गुढीपाडवा, रमजान ईद, तसेच श्रीराम नवमी या सणांच्या तसेच नागपूर येथे घडलेल्या अप्रिय घटनेच्या अनुषंगाने पनवेल शहरातील कर्नाळा भाजी मार्केट या ठिकाणी दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर दंगा काबू योजनेच्या रंगीत तालमीत पोनी गुन्हे सह 02 सपोनी, 02 पोउपनिरी आणि 30 पोलीस अंमलदार, बीट मार्शल क्रमांक 1,2,3,4 व 5 वरील अंमलदार, पनवेल मोबाईल 2 वरील अंमलदार यांच्या सह नवी मुंबई महानगरपालिका पनवेल अग्निशामक विभागाची फायरबंबसह 01 अधिकारी आणि 07 कर्मचारी उपस्थित होते.

## जयमाला कांबळे बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



राहत्या घरातून ४० वर्षीय महिला कुणालाही काहीही न सांगता निघून गेली आहे. जयमाला रवी कांबळे असे तिचे नाव असून ती मनोरुग्ण आहे. रविवारी सायंकाळी साडेसाच्या सुमारास राजापाडा, तळोजा येथून ती निघून गेली आहे.

उंची ४ फुट २ इंच, रंग सावळा, बांधा मध्यम, चेहरा उभट, टोकदार नाक, अंगात राखाडी रंगाची साडी नेसली असून तिला मराठी भाषा बोलता येते. या वर्णनाची महिलेबाबत काही माहिती मिळाल्यास ८६५५३५४११७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन तळोजा पोलिसांनी केले आहे.




**दैनिक युवक आधार - छत्रपती संभाजीनगर**

जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष तसेच शिक्षण प्रेमी अनेक पुरस्कार प्राप्त जिल्ह्याच्या विकासासाठी अहोरात्र काम करणारे मा. श्री. दिलीप स्वामी सर(IAS) यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ ना देता पुस्तक देऊन सत्कार करताना हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर!

# ग्रामीण साहित्य चळवळ म्हणजे संस्कृती टिकवण्याचे साधन आहे ...लेखक आनंदा खोंद्रे




**दैनिक युवक आधार**
**कवि सरकार इंगळी**

कवी सरकार स्वाभिमानी वाचनालय इंगळी व श्री संत गजानन महाराज प्रतिष्ठान आणि विद्यामंदिर लोकमान्य नगर कोरीचे यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकताच येते मोठ्या उत्साहात 23 वे छत्रपती शंभुराजे ग्रामीण साहित्य संमेलन पार पडले . सकाळी विद्या मंदिर लोकमान्य नगर कोरोची याशाळेतील सर्व शिक्षक वर्ग विद्यार्थी वर्ग ग्रामस्थ व मान्यवर साहित्यिक मंडळी यांच्या उपस्थितीत ग्रंथ दिंडी काढण्यात आली ग्रंथ दिंडीचे पूजन ह भ प संजय गोंदकर यांच्या हस्ते करण्यात आले संमेलनाची सुरुवात प्रतिमा पूजन माननीय सरपंच डॉक्टर संतोष भोरे यांच्या हस्ते करण्यात आले उद्घाटन ज्येष्ठ साहित्य शिवराज कॉलेजचे अध्यक्ष आदरणीय प्राध्यापक किसनराव कुऱ्हाडे यांचे असते करण्यात आले .मान्यवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून वह भ प संजय गोंदकर यांच्या वंदनाने संमेलनाची सुरुवात झाली प्रास्ताविक सुरेखा कुंभार व स्वागताध्यक्ष अमित काकडे यांनी केले कवी सरकार इंगळी यांच्या हस्ते मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार सन्मान करण्यात आला .याचवेळी कवी कवी सरकार विलास पाटील इंगळी लिखित रानातल्या कविता व साहित्य संमेलन विशेषांक प्रकाशन माननीय डॉक्टर श्रीकांत पाटील राष्ट्रपती शिक्षक पुरस्कार प्राप्त लेखक कादंबरीकार यांच्या हस्ते करण्यात आले

सकाळी उद्घाटन सत्रात आदरणीय सरपंच संतोष भोरे शांतिनाथ पाटील यांनी मनोगत व्यक्त केले तसेच प्राध्यापक किसनराव कुराडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले संमेल अध्यक्ष प्राध्यापक कथाकथन कार लेखक आनंदा खोंद्रे सर यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात मार्गदर्शन करताना म्हणाले की ग्रामीण साहित्य चळवळ हे संस्कृती जपण्याचे एक साधन आहे आज मोबाईल व टीव्हीच्या जमान्यात लोकांना साहित्याची आवड निर्माण व्हावी यासाठी ग्रामीण भागात साहित्य चळवळ राबवण्याचे कार्य प्रत्येक साहित्यिक मंडळींनी करायला हवे असे मत व्यक्त केले दुपारच्या सत्रात परिसंवादात प्राध्यापक कवी दीपक पवार रुकडी सुरेखा वाडकर इचलकरंजी सौ विद्या खामकर गारगोटी यांनी महिला व मुली सुरक्षित आहेत का या विषयावर आपले विचार व्यक्त केले . तिसऱ्या सत्रात कथाकथन कार संमेलन अध्यक्ष आदरणीय आनंदा खोंदरे सर यांनी बहारदार कथाकथन सादर केले चौथ्या सत्रात बहारदार तरी संमेलन आदरणीय प्राध्यापक कवी रवींद्र महापुरे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन पार पडले यावेळी प्रसिद्ध कादंबरीकार डॉक्टर श्रीकांत पाटील घुणकी प्रसिद्ध कादंबरीकार यांनी कवी सरकार विलास पाटील लिखित रानातल्या कविता या पुस्तक प्रकाशावर त्यांनी आपले मौलिक असे विचार मांडून नवोदित साहित्यिकांनामार्गदर्शन केले . तसेच या संमेलनामध्ये अनेक नवोदय कवीने सहभाग नोंदवला होता या मध्ये काव्य स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेत परळीची कवी गोविंद पाठक यांचा प्रथम क्रमांक तर द्वितीय क्रमांक धाराशिव चे कवी सुभाष चव्हाण तसेच तृष्ठी क्रमांक अमर गंगथडे व उत्तेजनार्थ महेश काळिंगे नांदणी यांना देण्यात आला .परीक्षक अमर कांबळे कवी दीपक पवार रुकडी यांनी केले . या संमेलनात विद्या खामकर सुरेखा वाडकर कल्याणी भोसले अनंत साळुंखे बार्शी सौ सुश्मिता रेंदाळकर पुणे सौ जयश्री गीताजे जयसिंगपूररशीद तहसीलदार इचलकरंजी कांचन दत्त पाटील कोल्हापूर श्रीमती सुषमा साखरे यास अनेक मुला-मुलींनी यामध्ये सहभाग नोंदवला . शेवटी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना माय मराठी छत्रपती शंभुराजे प्रेरणापुर समाज रत्न समाजकार्य आदर्श सरपंच पुरस्कार असे विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले .

यावेळी मुख्याध्यापक बाळासाहेब ढोले विजय पाटील नारायण काकडे सावकर हेगडे नितीन पाटील आनंदा शेट्टी दत्तात्रय देसाई शीतल पाटील श्री संत गजानन महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप सुतार हो इतर मान्यवर उपस्थित होते .सूत्रसंचालन विद्या खामकर सुरेगाव वाडकर यांनी केले शेवटी आभार प्रदर्शन बाळासाहेब डोळे मुख्याध्यापक विद्यामंदिर लोकमान्य नगर कोरोची यांनी केले .

## केम्सपॅक केमिकल्सच्या कंत्राटी

### कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याची जागृती फाऊंडेशन चि मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



तळोजा एमआयडीसी येथील केम्सपॅक केमिकल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील कंत्राटी कामगारांनी कंपनीच्या गेट समोर उपोषणाचे हत्यार उपसले आहे. थकीत वेतन मिळावे आणि नोकरीमध्ये सामावून घेण्याची मागणी स्थानिक कंत्राटी कामगारांनी केली आहे. या बाबत 104 कंत्राटी कामगारांनी जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांची भेट घेतली, कामगारांचे म्हणणे ऐकुन घेत स्थानिक कामगारांवर अन्याय होऊ नये बेरोजगार होऊ नये यामुळे

**केम्सपॅक केमिकल्सच्या कंत्राटी**

कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याची मागणी जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी प्रशासनाला केली आहे. कामगारांना नोकरीत सामावून घेत नाहीत तोपर्यंत लढा दिला जाईल असे सोनावणे यांनी यावेळी सांगितले

केम्सपॅक या कंपनीत १०४ कामगार कंत्राटी पद्धतीने काम करीत होते. कंपनीला आग लागल्यानंतर काही महिने कंपनी व्यवस्थापनाने बंद केली होती, पुन्हा नव्याने कंपनी सुरू करण्यात आली मात्र त्यांतील काही कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यात आले. तर काहींना त्यांचे वेतन थेट खात्यात जमा करून कोणतीही पूर्वसूचना न देता घरी बसवण्यात आले त्यानंतर कंपनीने कंत्राटदाराला बदलून कंपनीने नवीन कंत्राटदाराची नेमणूक केली. त्यामुळे येथील स्थानिक पडघे, कोलवाडी वावंजे आदी गावातील स्थानिक कामगार कामापासून वंचित ठेवले. सध्या कामगारांची आवश्यकता असुन देखील कंपनीत नाक्यावरील परप्रांतीय कामगार आणून काम केले जाते मात्र स्थानिक कामगारांना कामावर घेण्यास कंपनी व्यवस्थापनाने कानाडोळा केल्याचे चित्र असल्याचे या कामगारांनी सांगितले. यासंदर्भात डिसेंबर २०२४ मध्ये कामगार उपायुक्त, पनवेल यांच्याकडे झालेल्या सुनावणीत कंपनी टप्प्याटप्प्याने कामगारांना नोकरीमध्ये सामावून घेईल, असे सांगितले होते, मात्र त्यांनी तसे केले नाही. त्यामुळे या कामगारांनी आमरण उपोषण केले ते देखील प्रशासनाच्या मदतीने चिरडण्याचा प्रयत्न कंपनी करीत आहे, स्थानिक पोलीस यंत्रणेवर दबाव टाकत कंपनी स्थानिक कामगारांवर अन्याय करीत आहे थकीत वेतन मिळावे, तसेच पुन्हा नोकरीवर सामावून घ्यावे या मागण्यांसाठी सुरु केलेले हे आंदोलन न्याय मिळेपर्यंत कामगारांन सोबत सनदशीर मार्गाने लढा देउ असे फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी सांगितले .

## वीर वाजेकरए.एस.सी.महाविद्यालय, फुंडे-उरण आणि अंजुमन इस्लाम महाविद्यालय, मुरुड यांच्यात सामंजस्य करार संपन्न

**दैनिक युवक आधार**
**कॉलेजकट्टा/आरती सुरवसे**



वीर वाजेकरए.एस.सी.महाविद्यालय, फुंडे-उरण आणि आणि अंजुमन इस्लाम महाविद्यालय, मुरुड यांदोन महाविद्यालयात व्यवस्थापन अध्ययन( BMS), वाणिज्य आणि माहिती तंत्रज्ञान (B.Sc. IT) विभागांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक विकासाला चालना देणे व दोन्ही महाविद्यालयांमध्ये संशोधन व कौशल्यविकास उपक्रम राबवणे असा आहे. या कराराच्या अंतर्गत खालील उपक्रम राबवले जातील 1) विद्यार्थी आणि प्राध्यापक आदान-प्रदान कार्यक्रम,2) संयुक्त संशोधन प्रकल्प आणि कार्यशाळा, 3) 3) 3)कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण, 4) संघटित औद्योगिक भेटी आणि इंटर्नशिप संधी,5) संयुक्त सेमिनार आणि करिअर मार्गदर्शन सत्रे आदि उपक्रम राबविण्यात येतील. सदरचा करार दोन्ही महाविद्यालयाच्या वतीने संपन्न झाल्या नंतर या संदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना, "वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद एन. ठक्कर यांनी या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, "हा करार विद्यार्थ्यांसाठी नवीन शैक्षणिक, संशोधन आणि व्यावसायिक संधी निर्माण करेल. BMS, वाणिज्य आणि B.Sc. IT विभागातील विद्यार्थी व्यावहारिक ज्ञान मिळवून उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात स्वतःला सिद्ध करू शकतील." तर अंजुमन इस्लाम महाविद्यालय, मुरुडचे प्राचार्य डॉ. सजिद एफ. शेख यांनीही या कराराचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, "उच्च शिक्षणात गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा करारांची अत्यंत गरज आहे. आम्ही या सहकार्याचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी वचनबद्ध असल्याचे ते म्हणाले. या सामंजस्य करारामुळे दोन्ही महाविद्यालयांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण होईल, उद्योग आणि शिक्षण यामधील दरी भरून काढली जाईल आणि विद्यार्थ्यांना उज्ज्वल करिअरसाठी नव्या संधी उपलब्ध होतील. आगामी शैक्षणिक वर्षात या कराराच्या अनुषंगाने विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत या सामंजस्य करारामुळे दोन्ही महाविद्यालयांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण होईल, उद्योग आणि शिक्षण यामधील दरी भरून काढली जाईल आणि विद्यार्थ्यांना उज्ज्वल करिअरसाठी नव्या संधी उपलब्ध होतील. आगामी शैक्षणिक वर्षात या कराराच्या अनुषंगाने विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

# उरण पोलिसांची कामगिरी कौतुकास्पद

## मोटार सायकल चोरी करणारे आरोपी जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**




सातत्याने गजबजलेल्याउरण तालुक्यात विशिष्ठ प्रकारे गुन्हे पद्धतीचा वापर करून आरोपी हे जेएनपीए परिसरांतील वेअर हाउसच्या भिंतीलगत बाहेरील बाजूस पार्किंग करून ठेवण्यात आलेल्या मोटार सायकलची चोरी करीत असत अखेर या अट्टल मोटार सायकल चोरांना उरण पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन व्यक्तींना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्या कडुन आत्तापर्यंत 6 गुन्हे उघडकीस आणले असून त्यांच्या कडून विविध कंपनीच्या 6 मोटार सायकल हस्तगत केल्या आहेत .त्यांची अंदाजे किंमत 1 लाख 80 हजार रु. इतकी आहे. उरण पोलिसांची तत्परता आणि गुन्ह्याची केलेली उकल यामुळे उरण पोलिसांवर कामगिरी कौतुकाचा वर्षाव होत आहे. पोलीस अधिकृत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या गुन्ह्यात आरोपी क्र.1) शरद भारत सांगोलकर(वय 29 वर्षे),रा. साईबाबा मंदिराच्या पाठीमागे मु. नवघर,ता. उरण,जि.रायगड,मूळ,रा.वाकी-घेरडी, ता.सांगोला, जि.सोलापूर,व आरोपी क्र.2) संजय तमा निमगरे(वय 34वर्षे) रा. साईबाबा मंदिराच्या पाठीमागे मु. नवघर ता.उरण जि.रायगड, मूळ रा.वाकी-घेरडी, ता.सांगोला, जि.सोलापूर यांना अटक केल्या नंतर त्यांची कसून चौकशी केली असता , उरण पोलीस ठाणे येथे गुन्हा.राजी.क्र.07/2025,गुन्ह्यातील मोटार सायकल क्र.MH 05 CS 6544, गुन्हा. राजी.क्र 08/25,मधील MH 46 AW 1177 ,गुन्हा.राजी.क्र 282/24, मधील MH 24 BA 3846, गुन्हा.राजी. क्र 331/2024 मधील MH 46 BT 9972 आणि पनवेल पोलीस ठाणे येथे गुन्हा.राजी.क्र 08/2024 या गुन्ह्यांतील मोटार सायकल क्र.MH46 AY1959 या गाड्यांची उकल झाली आहे.तर सदरच्या आरोपी कडुन एक हिरो होंडा स्लेनडर इंजिन क्र.03A18M23221 मोटारसायकल संदर्भात RTO कार्यालयाकडे पत्रव्यवहार करून तपास करण्यात येत आहे. या सर्व गुन्ह्यांची नोंद भा.न्या.सं.2023 चे पोह्वा कलम 303(2),3 (5) अन्वये नोद आहे. सदरच्या गुन्हे तापस कामी परीमंडळ-2 पनवेलचे पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहिते,पोर्टविभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल नेहुल नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ. आणि त्यांचे सहकारी उरण पोलीस ठाण्याचे सपोनिनितीन खाडे,पोउपनी संजय राठोड,पोह्वा/3518अधिकारी, पोह्वा/1341ठाकूर, पोह्वा/967 पाटील. पोह्वा/1987 भगत, पोह्वा/2138 फंड, पोह्वा/1950 शिंपी, पोह्वा/1744 घरत,पोशी/3048 माळशिकारे,पोशी/12024शेख, पोशी/3950 भोर्जेया सर्वांनी अथक प्रयत्न करून गुन्हे उघडकीस आणले आहेत व पोलीस कस्टडी रीमाड घेऊनसदर आरोपी कडून अधिकाधिक गुन्हे उघडकीस आणण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यंच्य या कामगिरी बबत उरण पोलिसांवर कामगिरी कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# गाईच्या (गोमाता)शेणाचे महत्तव व उपयोग

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



गायीचे शेण (पंचगव्य) बहुगुणी, बहुउपयोगी.हिंदू धर्मात गायीला मातेसमान मानले जाते. गायीमध्ये 33 कोटी देव-देवतांचे वास्तव्य असते, अशी धार्मिक श्रद्धा आहे, म्हणून ती सर्वात पवित्र प्राणी मानली जाते आणि तिची पूजा करण्याची परंपरा आहे. पण, केवळ गायच नाही तिच्यापासूम मिळणारे गोमूत्र आणि शेणही पवित्र मानले जाते. गायीच्या शेणापासून बनवलेल्या शेणाचा वापर अन्न तयार करणे, पूजा, विधी आणि हवन करण्यासाठी केला जातो. एवढेच नाही तर कोणत्याही ठिकाणी धार्मिक शुद्धीकरणासाठी त्या ठिकाणी शेणाने सारवले जाते. तसेच पवित्र पूजा-विधींमध्ये शेणाच्या गोवऱ्या नक्की वापरल्या जातात'पंचगव्य', म्हणजेच गोमुत्र, शेण, दुध, तूप आणि दही या गायीपासून मिळणाऱ्या पाच वस्तूंचे फायदे आणि उपयुक्तता यांवर अधिक संशोधन करण्याबाबतची ही प्रपोझल्स असल्याचे समजते. गोमुत्राचे औषधी उपयोग सर्वश्रुत असून, याचा वापर अनेक औषधींमध्ये केला जातो. गोमुत्र वेदनाशामक असून, हे अतिशय प्रभावी प्रतिजैविक आणि रोगाणुनाशक आहे. हे ज्वरनाशी, अँटी फंगलही आहे. गोमुत्राचे सेवन हे शरीरासाठी एखाद्या औषधीसारखे काम करीत असून, याच्या जोडीने घेतलेल्या इतर औषधींची क्षमता ही वाढते. कर्करोगाच्या उपचारासाठी देखील गोमुत्र लाभदायक असल्याचे म्हटले जाते. तसेच लिव्हर, श्वसनाशी निगडित विकार व हृदयाशी संबंधित विकारांवरही गोमुत्र लाभदायक असल्याचे म्हटले जाते. गोमुत्र रक्तशुद्धी करणारे, शरीराचे तापमान नियंत्रित ठेवणारे, आणि स्नायू व हाडांना पोषण देणारे आहे. गायीचे शेण गंधक, सोडियम, मँगनीज, झिंक, फॉस्फोरस, नायट्रोजन यांसारख्या तत्वांनी परिपूर्ण असून, हे केवळ खत म्हणून नव्हे तर औषधी म्हणून ही फायद्याचे आहे. जर काम करीत असताना अचानक भाजले तर त्यावर गायीच्या शेणाचा लेप वेदनाशामक ठरतो. त्याचबरोबर पाय मुरगळला, त्यावर सूज आली, किंवा पडल्यामुळे शरीरावर एखाद्या ठिकाणी मुका मार लागला, तर गायीचे शेण एका कपड्यामध्ये बांधून त्याची पुरचुंडी तयार करावी. ही पुरचुंडी तव्यावर गरम करून मुका मार लागला आहे त्या ठिकाणी शेक घ्यावा. याने सूज आणि वेदना कमी होण्यास मदत होते. गायीच्या शेणाचा लेप अनेक त्वचारोगांवरही उपयुक्त आहे. तसेच गायीच्या शेणाच्या गोवऱ्या जाळून त्याचा धूर केल्याने डासांचा नायनाट होतो.गायीचे दुध, दही आणि तूप आरोग्याच्या दृष्टीने उत्तम असून, यांचे औषधी गुणही सर्वश्रुत आहेत. गायीचे दुध पचायला हलके आणि पौष्टिक आहे. गायीच्या दुधाने बनविले गेलेले तूप आहारासोबत अनेक घरगुती उपचारांसाठी देखील वापरले जाते. ताप आला असल्यास किंवा शरीरामध्ये वारंवार उष्णता होत असल्यास गायीच्या दुधाने किंवा तुपाने तळपायांची मालिश करावी. यामुळे उष्णता कमी होण्यास मदत होते. सतत कॉम्प्यूटरचे काम केल्याने किंवा जास्त वाचन करावे लागल्याने डोळे थकतात, लाल होतात, डोळ्याची आगही होते. अशा वेळी गायीच्या दुधामध्ये भिजविलेल्या कापसाच्या पातळ पट्ट्या डोळ्यांवर ठेवल्याने आराम मिळतो.

## आ. विक्रांत दादा पाटील यांनी घेतली सिडको नैना प्रकल्प विषयी महत्वपूर्ण बैठक - मुंबई

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**



आ. विक्रांत दादा पाटील यांनी नैना प्रकल्प व त्यातील अडचणी संदर्भात विधान भवनात लक्षवेधी मांडून सरकारचे लक्ष वेधून घेतल्यानंतर या विषयाची तातडीने विशेष बैठक लावण्याची मागणी केली होती. त्यानुसार पनवेल उरण मधील ग्रामस्थ व शेतकऱ्यांचे गंभीर प्रश्न घेऊन नगरविकास राज्य मंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडको प्रशासनाची एक महत्वपूर्ण बैठक आज सिडको निर्मल भवन मुंबई येथे संपन्न झाली. या बैठकी दरम्यान ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या बाधित घरांना नियमित करणे, शेतकऱ्यांच्या मूळ घरावर आरेखित केले गेलेले इतर शेतकऱ्यांचे ४०% प्लॉट तथा शेतकऱ्यांच्या घरांवर टाकली गेलेली गार्डन, ओपन स्पेसेस व इतर आरक्षणे या बाबत आरक्षण इतरत्र हलवण्यासंदर्भात बदल करून तातडीने निर्णय करणे,गावठाण लगतच्या बांधकामांना नियमित करण्यासाठी UDCPR मधील कनजेस्टेड एरिया साठीच्या तरतूदी लागू करणे, पुनर्विकासाकरिता वाढीव FSI देणे, रस्त्यात बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या बांधकामांना योग्य मोबदला, पुनर्वसन या बाबत सकारात्मक निर्णय करणे, शेतकरी व ग्रामस्थानची योग्य पध्दतीने संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करणे व अडचणी दूर करणे. या सर्व व इतर अति महत्त्वाच्या विषयांवर विस्तृत चर्चा झाली.

सिडको प्रशासनाने प्रश्न सोडविण्यासंदर्भात मंत्री महोदयांसमोर सकारात्मक भूमिका घेतली. येणाऱ्या कालावधी मध्ये हे सर्व प्रश्न सुटण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न व पाठपुरावा करण्यासाठी आम्ही काटीबद्ध असल्याचे आ. विक्रांत दादा पाटील यांनी सांगितले. या बैठकीस मा. कोकण म्हाडा सभापती श्री. बाळासाहेब जी पाटील, सिडको व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय जी सिंगल, JMD शंतनू जी गोयल, JMD गणेश जी देशमुख,मुख्य लँड सर्वे ऑफिसर समाधान खटकाळे, मुख्य नियोजन अधिकारी श्री. मानकर,अतिरिक्त नियोजन अधिकारी डॉ प्रिया, मंत्री महोदयांचे स्वीय सहाय्यक डॉ प्रशांत जी रसाळ यांच्यासह सिडकोचे सर्वच प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्याची महाराष्ट्र कर्मचारी युनियनची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर**
महापालिकेच्या परिवहन विभागातील कायम कर्मचाऱ्यांना आरोग्य विमा देण्यात यावा, महापालिका परिवहन विभागातील महिला कर्मचाऱ्यांसाठी महिला कक्षात, प्रत्येक डेपोतील टॉयलेटमध्ये तसेच मुख्यालयात सॅनेटरी नॅपकिन मोफतपणे उपलब्ध करुन देणारी मशिन कार्यान्वित करावी, महापालिकेतील सेवानिवृत्त वाहन चालकांना सेवानिवृत्तीनंतर करार पद्धतीने सेवेत सामावून घेण्याची लेखी मागणी महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे आणि परिवहन व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांच्याकडे केली आहे. महापालिका प्रशासनाच्या परिवहन विभागात काम करणारे कायम कर्मचारी वाढत्या महागाईच्या तुलनेत तुटपुंज्या वेतनावरच काम करत आहेत. या कायम कर्मचाऱ्यांना काम करताना अपघात झाल्यास त्यांच्या उपचाराची व्यवस्था करणे महापालिकेच्या परिवहन विभागाचे काम आहे. अपघात झाल्यास या कायम कर्मचाऱ्यांना उपचारासाठी इतरांकडे हात पसरावे लागतात अथवा बँका, पतसंस्थांकडे कर्ज काढावे लागते. परिवहन विभागाने कंत्राटी कामगारांसाठी आरोग्य विमा योजना लागू केली आहे. त्याच धर्तीवर कायम कर्मचाऱ्यांसाठीही परिवहन विभागाने आरोग्य विमा योजना लागू करणे आवश्यक आहे. कामादरम्यान अपघात झाल्यास कायम कर्मचाऱ्यांना उपचार घेण्यात कोणतेही आर्थिक अडथळे निर्माण होणार नाहीत अथवा त्यांच्यावर कर्जबाजारी होण्याचीही वेळ येणार नाही. कायम कर्मचारी हे परिवहन सेवेमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून इमानेइतबारे काम करत असल्याने त्याच्या आरोग्याची काळजी घेणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. आरोग्याच्या बाबतीत कायम कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडणे योग्य नाही. कंत्राटी कर्मचाऱ्यांना आरोग्य विमा सुविधा प्रशासन एकीकडे देत असताना दुसरीकडे कायम कर्मचाऱ्यांना आरोग्य विमा सुविधेपासून वंचित ठेवले जात आहे. कायम कर्मचाऱ्यांना उपचारासाठी येत असलेल्या आर्थिक अडचणी पाहता महापालिका प्रशासनाने परिवहन विभागातील कायम कर्मचाऱ्यांना तातडीने विमा सुविधा उपलब्ध करुन देण्याविषयी आपण संबंधितांना तातडीने निर्देश देण्याची मागणी केली आहे. महापालिकेच्या परिवहन विभागामध्ये चालक व वाहक म्हणून महिला कार्यरत आहेत. परिवहनच्या सफाई व अन्य विभागातही महिला वर्ग कार्यरत आहे. निसर्ग नियमाप्रमाणे महिलांना मासिक पाळीचा त्रास हा सहन करावाच लागतो. अशावेळी ऑनड्यूटी असताना मासिक पाळी सुरु झाल्यास महिला वर्गाची कोंडी होते. त्यांना त्रास सहन करावा लागतो. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी परिवहन विभागामध्ये काम करणाऱ्या सर्वच आस्थापनेतील महिला कर्मचाऱ्यांना महापालिक प्रशासनाने प्रत्येक डेपोमध्ये उपलब्ध असलेल्या महिला कक्षामध्ये, टॉयलेटमध्ये तसेच मुख्यालयामध्ये सॅनेटरी नॅपकिन मोफतरित्या उपलब्ध करुन देणारी मशिन तातडीने बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे महिला वर्गाची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही. सॅनेटरी नॅपकिनसाठी त्यांना धावपळही करावी लागणार नाही व त्यांची कोंडीही होणार नाही. महिला वर्गाच्या या महत्वपूर्ण समस्येचे निवारण करण्यासाठी आपण संबंधितांना महापालिका परिवहन विभागातील महिला कर्मचाऱ्यांसाठी महिला कक्षात, प्रत्येक डेपोतील टॉयलेटमध्ये तसेच मुख्यालयात सॅनेटरी नॅपकिन मोफतपणे उपलब्ध करुन देणारी मशिन कार्यान्वित करणेबाबत निर्देश देण्याची मागणी केली आहे. नवी मुंबई महापालिका प्रशासनात वयाची 58 वर्षे पूर्ण झाल्यावर अनेक वाहन चालक सेवानिवृत्त होत आहेत. त्यातच महापालिकेच्या विविध आस्थापनेतील अनेक विभागांमध्ये चालकांची संख्या कमी आहे. चालक संख्या कमी असल्याने विविध यंत्रणेवर ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सेवानिवृत्त झालेल्या ज्या वाहनचालकांना पुन्हा महापालिका प्रशासनात काम करावयाची इच्छा असेल तर अशा वाहनचालकांना महापालिका प्रशासनाने करार पद्धतीने पुन्हा सामावून घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन सेवानिवृत्तीनंतरही चालकांना रोजगार भेटेल आणि महापालिका प्रशासनामध्ये भेडसावत असणारी चालक कमतरतेची समस्याही निकाली निघेल. आपण या मागणीवर सकारात्मक विचार करुन संबंधितांना महापालिकेतील सेवानिवृत्त वाहन चालकांना सेवानिवृत्तीनंतर करार पद्धतीने सेवेत सामावून घेण्याचे निर्देश देण्याची मागणी कामगार नेते रविंद्र सावंत यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

## युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने घरकुल धारकांना मोफत रेती मिळण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांना दिले निवेदन

**यवतमाळ प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



**राळेगाव:** युवा ग्रामीण पत्रकार संघटना राळेगाव यांच्या वतीने दिनांक:-२५/०३/२०२५ ला राळेगाव येथील उपविभागीय अधिकारी विशाल खत्री,तहसिदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार पंचायत समिती राळेगाव यांना तालुक्यातील घरकुल धारकांना व विहीर बांधकाम धारकांना शासनाकडून मोफत रेती उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन देण्यात आले, शासन गोरगरीब जनतेला घरकुल देतात परंतु रेती अभावी त्या गोरगरीब जनतेचे घर बांधणी होत नाही पंचायत समिती पातळीवर नोटीसा देण्यात येतात की इतक्या दिवसात घर पूर्ण करा परंतु रेती नसल्यामुळे घर पूर्ण होऊ शकत नाही शासन फक्त घोषणा करतात की घरकुलधारकांना मोफत रेती मिळणार परंतु त्याची मात्र अंमलबजावणी करताना दिसत नाही, राळेगाव तालुक्यामध्ये वर्धा नदी लागून असल्याने तालुक्यामध्ये अनेक रेतीचे घाट आहे, परंतु ते लिलाव न झाल्याने सर्व अडचणी निर्माण होतानी दिसत आहे, तरी सर्व रेती घाट लिलाव करण्यात यावे अशी जनता बोलतानी दिसत आहे, राळेगाव तालुक्यातील सर्व घरकुल धारकांना व विहीर बांधकाम धारकांना लवकरात लवकर शासनाकडून मोफत रेती उपलब्ध करून देण्यात यावे यासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघटना राळेगाव च्या वतीने निवेदन देण्यात आले यावेळी युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष संजय कारवटकर, युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे राळेगाव तालुका अध्यक्ष खुशाल वानखेडे, कार्याध्यक्ष उमेश कांबळे, सचिव शशीम कांबळे, उपाध्यक्ष लोकेश दिवे, संघटक गोपीचंद ढाले, कोषाध्यक्ष असलम पठाण, प्रसिद्ध प्रमुख अरविंद कोडापे, सदस्य कैलास कोडापे,जितेंद्र खोडे,शंकर पंधरे,रंजत चांदेकर, जगदीश गोबाडे, सुरज ढाले, बंडु भारसकरे, महादेव टेकाम, सुरज पत्रकार हे सर्व पत्रकार हजर होते

## मैत्रीचं नातं हे सर्व नात्यापेक्षा श्रेष्ठ असते संपत गारगोटे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**

कडूसः स्वर्गीय संतोषदादा साहेबराव कालेकर यांचा 6 वा स्मृती दिनाचे आयोजन कडूस येथिल शेंडेवाडीत करण्यात आले होते, यावेळी प्रसिध्द व्याख्याते संपत गारगोटे यांचे "मित्र वनव्यामध्ये गारवासारखा " या विषयावरती व्याख्यान संपन्न झाले. विशेष म्हणजे संतोषभाऊ कालेकर यांच्या सर्व मित्रांनी स्वखर्चाने या कार्यक्रमाचे आयोजन केलं होते. स्व. संतोषदादाच्या मित्रांनी सहा वर्षापूर्वी हृदयविकाराने मृत्यू पावलेल्या आपल्या मित्राचा 6वा स्मृतिदिन स्वखर्चाने केला त्या सर्व मित्रांचे कार्याचे कौतुक संपत गारगोटे यांनी केले. यावेळी संपत गारगोटे यांनी मैत्रीचे महत्त्व विशद करत असताना मैत्री हे एक खास आणि अमूल्य नाते आहे, जे आपल्या जीवनात आनंद आणि अर्थ भरते. मैत्री म्हणजे विश्वास, प्रेम आणि आपुलकीचे नाते, जे आपल्याला अडचणीच्या काळात आधार आणि साथ देते. मैत्री हे एक नाते आहे, आपल्याला भाऊ,बहीण ही नाते जन्माने मिळतात ते कसेही असोत आपल्याला ते नाते मान्य करावे लागते. पण मैत्री हे असे नाते आहे जे आपण स्वतः ठरवून रक्ताच्या नात्यापेक्षाही अधिक घट्ट नाते बनवू शकतो.मैत्रित विश्वास महत्त्वाचा असतो. एकमेकांविषयीची ओढ महत्त्वाची असते. असे सांगितले. मैत्रीत स्त्री ,पुरुष, रंग,रुप, जात, धर्म हा भेदही नसतो. मैत्री हे एक अनमोल नाते आहे. प्रेमापेक्षा मैत्री महत्त्वाची असते, कारण प्रेम तर सगळ्यांना एकदा तरी रडवते आणि मैत्री ही दुःखातही हसवते. कधी कधी ज्या गोष्टी आपण आपल्या घरच्यांना सांगू शकत नाही त्या आपण सहजपणे आपल्या मित्रांना सांगतो. म्हणुन आपल्याला एक तरी मित्र जोडता यायला हवा असे आवाहन संपत गारगोटे यांनी श्रोता वर्गांना केले. स्व. संतोषदादा साहेबराव कालेकर यांच्या स्मृती दिनाचे आयोजन स्व. संतोषदादाचे जवळचे मित्र संदिपभाऊ शेंडे , गणेश सुकाळे , विश्वास डावरे, शादिक शेख,अजिज शेख या मित्रांनी स्वखर्चाने केले होते.स्व.संतोषदादा कालेकर यांचे कार्य हे समाजासाठी, गावासाठी व आपल्या सर्व नातेवाईकांसाठी अभिमानास्पद होतं याची जाणीव ठेवून त्यांच्या मित्रांनी वेगवेगळे उपक्रम घेऊन आजपर्यंत संतोष भाऊ यांच्या स्मृती जागवल्या आणि आपल्या मित्राच्या आठवणींना उजाळा देत असताना त्यांच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहत होत्या. या कार्यक्रमासाठी राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानचे खेड तालुक्याचे अध्यक्ष अनिल बारणे, होलेवाडी गावचे ग्रामपंचायत सदस्य कुंडलिक होले, राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानचे संघटक संतोष अभंग, प्रसिद्ध कायदेतज्ञ अँड.माणिक गारगोटे व अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी स्वर्गीय संतोष दादा कालेकर



मित्रपरिवार कडूस, स्वर्गीय संतोषदादा कालेकर क्रिकेट अकॅडमी, स्वर्गीय संतोष दादा कालेकर यांचे शाळा व कॉलेज मित्रपरिवार व हनुमान तरुण मंडळ शेंडेवाडी यांचे विशेष सहकार्य होते.

## वाकद येथील एकाच शेतकरी कुटुंबाने केले 22 जलतारा -ठाकूर कुटुंबाचा आदर्श

**रिसोड वार्ताहर**
**. रणजीत सिंह ठाकुर**

श्री कुंदनसिंह प्रेमसिंह ठाकूर व श्री लखनसिंह प्रेमसिंह ठाकूर दोन्ही बांधवांचा स्तुत्य उपक्रम

मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस यांच्या संकल्पनेतून तयार झालेला ड्रीम प्रोजेक्ट ला जिल्ह्यामध्ये चालना देण्याकरिता आपल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांनी पाणीटंचाई, पाणी समस्या, दुष्काळ यावर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जमिनीत पाण्याचा संचय करणे पाण्याचे पुनर्भरण करणे यासाठी वाशिम जिल्ह्यामध्ये *जलतारा* प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे त्याचाच एक भाग म्हणून माननीय उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर मॅडम व रिसोडच्या माननीय तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाकद येथील मंडळ अधिकारी श्री ए व्ही लहाने व तलाठी श्री जी जी गरकळ व तलाठी श्री अक्षय जाधव यांनी मागील काही



दिवसापासून सतत पाठपुरावा करून वाकद येथील शेतकऱ्यांना स्वखर्चातून स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन आपल्या शेतामध्ये जलतारा योजनाचा लाभ घेण्यासाठी प्रेरित केले त्याचाच एक भाग म्हणून आज वाकद येथील प्रगतशील शेतकरी श्री कुंदनसिंह प्रेमसिंह ठाकूर व भाजपाचे लखनसिंह प्रेमसिंह ठाकूर यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या वाकद येथिल शेतजमिनीमध्ये आज रोजी जलताराचे 22 खड्डे पूर्ण केले असून अजूनही उर्वरित जलतारा कांदा पिके निघाल्यानंतर घेण्याचे नियोजित आहे, आता *वाकद शिवारातील अशा शासनाच्या मदतीविना केलेल्या जलतारांची संख्या 35 झाली आहे यावेळी सदर कामाची पाहणी करण्यासाठी मंडळ अधिकारी ए व्ही लहाने, तलाठी जि जि गरकळ, तलाठी अक्षय जाधव यांचेसह नंदुभाऊ मगर, सुनील नारायण लाटे, विद्याधर दामोदर मोरे, हारगिर गिरी माजी सैनिक, शरद राजेंद्र मोरे बाळासाहेब देशमुख बंडू डहाके सुधीर मोरे खंडू माधव लाटे (महसूल सेवक) उपस्थित होते, मागील अनेक दिवसापासून माननीय जिल्हाधिकारी वाशिम, माननीय उपविभागीय अधिकारी वाशिम यांनी जलतारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे या प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्याना आपल्या शेतात एकूण एका एकरासाठी एक याप्रमाणे उताराच्या दिशेने शेतात ज्या ठिकाणी पाणी साचते अशा ठिकाणी पाच बाय पाच फूट लांबी रुंदी व सहा फूट खोली असलेले खड्डे खोदकाम करून त्यामध्ये मोठे मध्यम व छोट्या आकाराचे दगड भरून हे खड्डे भरून घ्यावे आणि त्यामुळे पावसाळ्यात पावसाचे वाहणारे व गाळ वाहून नेणारे पाणी अशा ठिकाणी थोपून ते जमिनीमध्ये जिरवले जाईल यामधून "पाणी अडवा पाणी जिरवा" संकल्पना पूर्णत्वास जाईल

"जल है तो कल है" असे आपण म्हणतो परंतु खरे म्हणजे अशाप्रकारे ग्रामपातळीवर प्रत्यक्ष शेतकऱ्यांसोबत हात मिळवणी केल्याशिवाय शासनाचे हे काम पूर्णत्वास जाणार नाही आपल्या राज्याचे सिंचनाचे शिल्पकार विकास पुरुष कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सुरुवात केलेला स्तुत्य उपक्रम

या योजनेमध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांना ज्यांच्याकडे जॉब कार्ड आहे किंवा जे इतर जॉब कार्ड धारकामार्फत काम करून घेऊ इच्छितात त्यांच्यासाठी जवळपास 5000 रुपयांपर्यंतचे अनुदान रोजगार हमी योजनेअंतर्गत देय आहे तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा तसेच आपल्या गावातील व आपल्या परिसरातील मोठ्या शेतकऱ्यांनी हाच आदर्श घेऊन स्वयंस्फूर्तीने व स्वखर्चाने आपल्या शेतात जलतारांची निर्मिती करावी जेणेकरून भविष्यात सिंचनातून प्रगतीकडे प्रत्येक शेतकरी हा जायला पाहिजे व प्रत्येक शेतकऱ्याला जलतारा योजनेचा फायदा व्हायला पाहिजे त्याकरिता सर्वांनी आपल्या आपल्या शेतामध्ये ही योजना राबवावी असे आवाहन भाजपा उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेशाचे सचिव लखनसिंह ठाकुर यांनी केले

## उन्हामुळे पिकांची होरपळ वाढली

### फूल, फळगळीचे प्रमाण वाढले; फळांवर डाग पडल्याने गुणवत्ता खालावली



**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूरआनंतपाळ** : उन्हाचा पारा चढल्याचा परिणाम पिकांवर होत आहे. उन्हामुळे आंब्याची फळगळ वाढली असून, फळांवर डागही पडत आहेत. भाजीपाला पिकांची वाढ खुंटली असून मीर्चीवर बोकडा रोग पडला असुन पिकांची कडक उन्हामुळे होरपळ वाढली आहे. नवीन सुरु लागवड केलेल्या उसाचीही वाढ खुंटल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. नैसर्गिक आपत्ती यंदा शेतीचा पिच्छा सोडताना दिसत नाही. पावसाळा आणि उन्हाळ्यात अवकाळी पावसाने पिकांना तडाखा दिला. तर हिवाळ्यात काही दिवस तापमान नीचांकी राहिल्याने पिकांचे नुकसान झाले. आता उन्हाळा सुरू झाला तरीही तापमानातील बदल कायम आहे. दर पंधरा दिवसांनी तापमानात मोठे चढ-उतार होताना दिसतात. यंदा परतीचा पाऊस उशिरापर्यंत झाला. त्यामुळे उन्हाळी पिके, फळपिके, भाजीपाला उत्पादन हाती येईल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र शेतकऱ्यांच्या या स्वप्नावर उष्णतेचा आघात होताना दिसतो. मार्च महिन्यापासून वाढलेल्या तापमानामुळे पिकांची होरपळ होत आहे. या उष्णतेचा माणसांसह जनावरांनाही त्रास होत आहे.

**भाजीपाला सुकला...**

उन्हामुळे पालेभाज्या पिके सुकत आहे. पिकाची वाढ खुंटली. तर मिरचीची नवीन लागणही हातची जात आहे. पाणी बचतीसाठी उन्हाळ्यात शेतकरी मल्चिंगवर मिरची लागवड करतात. मात्र पिकाला पाणी दिल्यानंतर उन्हामुळे गरम वाफ तयार होत आहे. या वाफेमुळे अनेक ठिकाणी पिके जळत आहेत, असे शेतकऱ्यांनी सांगितले. यासोबत टरबूज, खरबूज, वांगी, दोडका, कांदा आदी पिकांवर उष्णतेचा परिणाम होत आहे. भाजीपाला पिकांसह उन्हाळी पिके आणि उसाची वाढ अति उष्णतेमुळे खुंटल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. या उन्हाळी सोयाबीनची उत्पादकता उष्णतेमुळे कमी राहील, अशी शक्यताही शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## इन्साफ म्हणजे सर्वांना समान न्याय

इस्लाम धर्मात अल्लाहने इन्साफ म्हणजे न्यायाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे.जीवनाच्या प्रत्येक बाबीशी निगडित क्षेत्रात इंसाफ झाला पाहिजे असे कुरआन शरीफ मध्ये अल्लाहने म्हटले आहे.

मोजतांना वजन कमी जास्त मोजू नये,कमी वजन देणाऱ्यांना कयामतच्या दिवशी आपल्या कृत्याचा जाब द्यावा लागेल हे त्यांनी लक्षात ठेवावे.मोजून घेताना जास्त घेऊ नये,ती लुबाडणूक समजली जाते. कुटुंबात जर दोन पत्नी असतील तर दोघींशी समान न्याय तुम्हाला करावा लागेल.एकीला कमी किंवा जास्त न्याय दिला तर त्याचा हिशोब द्यावा लागेल. मुला-मुलींना वाटणी देताना सुद्धा समान वाटप करणे आवश्यक आहे. घेताना चांगले घ्यायचे व देताना खराब द्यायचे हा न्याय होऊ शकत नाही.कोणत्याही गोष्टीचे वाटप करताना समान न्यायाने ती केली गेली पाहिजे.जमीन जुमला,संपत्ती व इतर कोणतीही गोष्ट तिचे वाटप अगर वितरण करताना ती समान तत्वाने सर्वांना सारखी दिली गेली पाहिजे. अन्यथा होणाऱ्या परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवली पाहिजे असे ही त्यात म्हटले आहे. मुस्लिम व्यक्तिगत कायदा हा इस्लामी शरियतशी निगडीत आहे.त्यामध्ये स्त्री अथवा पुरुष दोघांनाही पुरेपूर न्याय देण्याचा म्हणजेच इन्साफ करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मात्र हा विषय पूर्णपणे समजून न घेता केवळ राजकीय भूमिकेतून अलीकडच्या काळामध्ये काही निर्णय मुस्लिम समाजाच्या शरियतमध्ये ढवळाढवळ करणारे ठरू पाहत आहेत.त्यामुळे समाजात मोठी अस्वस्थता पसरलेली आहे. भारतीय घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे हनन त्यामुळे होत आहे. एकाच वेळी तीनदा तलाक देणाऱ्या पुरुषाला तुरुंगवास करण्याचा कायदा नुकताच केंद्र सरकारने संमत केला आहे. भारतीय मुस्लिम समाजाने भारतीय कायदे व भारतीय न्याय




व्यवस्थेचा नेहमीच आदर केला आहे. एकाच वेळी तीन तलाक हे इस्लाममध्ये ही मान्य नाही.मुस्लिम व्यक्तिगत कायद्यातही ते बसत नाही.शक्यतो तलाक देऊच नये असे शरियतमध्ये नमूद केले आहे.परंतु जिथे नाईलाज होतो,तिथे पती-पत्नीचे नाते संपुष्टात आणून वेगळे होण्याची देखील तरतूद केलेली आहे.पतीने तीन तलाक दिले म्हणून त्याला तुरुंगात पाठवताना पत्नीच्या उदरनिर्वाहाचे काय ? तिच्याकडे कोण लक्ष देणार ? याबाबत कोणतीही व्यवस्था केंद्र शासनाने केलेली नाही. दुसरा विषय म्हणजे गो हत्या बंदीचा कायदा देखील अशाच पद्धतीने अतिरेक करण्यात आला आहे.गो हत्या केलीच पाहिजे असे कुठे ही कुरआन अगर शरियत मध्ये म्हटलेले नाही. इंग्रजांनी आपल्या राजकीय फायद्यासाठी गोमातेचा वापर केला. गोहत्या बंदी कायदा आणताना कुरेशी किंवा खाटिक समाजाच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय शासनाने केलेली नाही. गोहत्या बंदी करतांना कुरेशी समाजासाठी पर्यायी व्यवस्था करून त्या समाजाला रोजगार उपलब्ध करून दिल्यास मटन विक्रीच ते बंद करतील अशी आज परिस्थिती आहे.परंतु शासनाने ते केलेले नाही.त्यामुळे अजून ही लपून छपून हा व्यवसाय केला जातो.परिणामी गुन्हे दाखल करावे लागतात.परंतु गुन्हे दाखल करण्याची वेळच येऊ नये आणि कुरेशी समाजाला पर्यायी रोजगार उपलब्ध करून दिला तर शासनाचा हेतू देखील सफल होईल. दुर्दैवाने देशातील विशिष्ट समुदायाला टार्गेट करून राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याचे प्रयत्न करताना भविष्यात देशांमध्ये नव्या प्रकारची यादवी निर्माण होणार नाही याचा ही विचार करण्याची आवश्यकता आहे.आपला भारत हा बहुधर्मीय देश आहे.सर्व धर्मियांची प्रगती झाली तरच देशाची प्रगती होणार आहे.त्यासाठी राजकीय उद्दिष्टे बाजूला ठेवून बलशाली भारताचे स्वप्न साकार करणाऱ्या नीतिमत्तेची गरज आहे. (क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**९२२६४०८०८२**

## वावंजे (पनवेल) येथे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कॉलेजच्या नवीन इमारतीचे उद्घाटन २८ मार्च २०२५ रोजी संपन्न होणार आहे

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

**नवी मुंबई** पनवेल तालुक्यातील वांवजे गावातील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व कै. गोटीराम पाटील कॉमर्स सायन्स ज्युनिअर कॉलेज श्री लक्ष्मण अर्जुन पाटील प्रि प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या नवीन इमारतीचे उद्घाटन सोहळा दिनांक २८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ठीक ४:३० वाजता संपन्न होणार आहे सदर कार्यक्रमाचे उद्घाटक माजी कृषिमंत्री.संरक्षण मंत्री. अध्यक्ष रयत शिक्षण संस्था सातारा माजी खासदार शरदचंद्र पवार कार्यक्रमाचे अध्यक्ष चेअरमन रयत शिक्षण संस्था सातारा.चंद्रकांत दळवी प्रमुख उपस्थिती विकास देशमुख सचिव रयत शिक्षण संस्था सातारा , डॉक्टर अनिल पाटील संघटक रयत शिक्षण संस्था सातारा डॉक्टर ज्ञानदेव म्हस्के कुलगुरू कर्मवीर विद्यापीठ सातारा , महेंद्र घरत जनरल बॉडी सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा आमदार बाळाराम पाटील चेअरमन रयत शिक्षण संस्था रायगड विभाग कामोठे.रामशेठ ठाकूर मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा आमदार प्रशांत ठाकूर जनरल बॉडी सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा , जे. एम. म्हात्रे जनरल बॉडी सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा . पाहुणे प्राचार्य डॉक्टर शिवलिंग मेनकुदले सहसचिव उच्च शिक्षण रयत शिक्षण संस्था सातारा ,डॉक्टर संजय कांबळे प्राचार्य महिला महाविद्यालय उंब्रज डॉ. नायक प्राचार्य



क.भा.पाटील विद्यालय वाशी.सुमित्रा भोसले मुख्य मॉर्डन स्कूल वाशी. प्राचार्य डॉक्टर राजेंद्र मोरे ऑडिटर रयत शिक्षण संस्था सातारा , बंडू पवार सहसचिव माध्यम रयत शिक्षण संस्था सातारा माननीय डॉक्टर विठ्ठल शिवणकर आचार्य बलवंत कॉलेज विटा. डॉक्टर अमोद ठक्कर. प्राचार्य वीर वाजेकर ए.एस.सी.विद्यालय फुंडे डॉक्टर गणेश ठाकूर प्राचार्य एम.पी.ए. एस.सी. विद्यालय पनवेल. जी.आर.पाटील चेअरमन स्थानिक स्कूल कमिटी वावंजे. पंकज.जी. पाटील चेअरमन जुनिअर कॉलेज वावंजे. एम. के.कोंगेरे विभागीय अधिकारी रयत शिक्षण संस्था रायगड विभाग कामोठे .काशिनाथ पाटील अध्यक्ष माजी विद्यार्थी संघटना. सौ.एस वि.भोईर पर्यवेक्षिका . आर.बी. कारंडे प्राचार्य श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जुनिअर कॉलेज वावंजे. लक्ष्मण अर्जुन पाटील . अब्दुल्लाही शेख . डी.बी.म्हात्रे. मच्छिंद्र पाटील. बी.एस.पाटील .विकास जोगले .दिनेश पाडेकर .रघुनाथ फराड .रामदास पवार मा.लहू सांगडे. गोमाशेठ म्हात्रे.परेशभाई पाटील . डी.पी.पाटील. मीनाक्षी श्रीवास्तव. एम.बी. पाटील .लहू शेठ पाटील .अंजू गुप्ता .भगवान सांगडे .काळुराम फडके या मान्यवरांची उपस्थिती असणार आहे व पनवेल परिसरातील सर्व नागरिकांना आव्हान केले आहे या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे शाळेचे चेअरमन जी.आर.पाटील यांनी सांगितले.

# महाबोधी विहारमुक्तीसाठी ठाण्यात बौद्ध समाजाचा एल्गार



**ठाणे** : बोधगया येथील ब्राह्मणाच्या ताब्यात असलेले महाबोधी विहार हे मुक्त करून ते बौद्धांच्या ताब्यात द्यावे, या मागणीसाठी ठाणे शहरात बौद्ध भिक्खुंच्या उपस्थितीत शिव-फुले-शाहू-आंबेडकर अनुयायी मोर्चा नियोजन समितीच्या वतीने विराट मोर्चा काढण्यात आला.

बिहार राज्यातील पाटणा बोधगया येथील महाबोधी विहारात ब्राह्मणांच्या ताब्यात असलेले महाबोधी विहार हे मुक्त करून ते बौद्धांच्या ताब्यात द्या, यासाठी देशभर भिक्खू संघाच्या नेतृत्वाखाली महाविहार मुक्तीसाठी मोठ्या प्रमाणात आंदोलने सुरू आहेत. त्याच अनुषंगाने हा मोर्चा काढण्यात आला. 'बुद्धम शरणम् गच्छामि' अशा सुरात जांभळी नाका येथून सकाळी ११ वाजता मोर्चास सुरुवात करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या मोर्चाचा समारोप होणार आहे. या मोर्चात दोन ते तीन हजार लोक सहभागी झाले होते. मोर्चा समितीच्या वतीने भदंत लामा यांच्या नेतृत्वाखालील भिक्खूसंघ, नानासाहेब इंदिसे, भास्कर वाघमारे राजाभाऊ चव्हाण आदींच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती, पंतप्रधान आणि बिहारच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. बोधगया महाबोधी विहार १९४९ चा कायदा त्वरित रद्द करण्यात यावा; बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन, भारतीय बौद्ध भिक्खूंच्या ताब्यात देण्यात द्यावे; बोधगया येथे उपोषण करीत असलेल्या बौद्ध भिक्खूंवर होणारा पोलिसी अत्याचार त्वरित थांबवून संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, आदी मागण्यांचा या निवेदनात समावेश करण्यात आला आहे.

दरम्यान, या मोर्चाचे नियोजन करण्यासाठी डॉ. प्रमोद जाधव, विमल सातपुते, सुमन इंगळे, दैवशाला हराळे आदींनी परिश्रम घेतले.

## निवडक

### गुढीपाडवानिमित्त विविध कार्यक्रम

**डोंबिवली** : गुढीपाडवा हिंदू नववर्ष स्वागत यात्रेची निर्मिती करणाऱ्या डोंबिवली शहराने गेली २७ वर्षे ही गुढीपाडवा नववर्ष स्वागत यात्रेची परंपरा जपली आहे. जुन्या डोंबिवलीकरांची ही परंपरा तंतोतंत पुढील पिढीने अबाधित राखली असून त्याच नियमात व शिस्तीत यात्रा श्री गणेश मंदिर संस्थानमार्फत आयोजित करण्यात आली आहे. यावर्षी गुढीपाडवा नववर्ष स्वागत यात्रेत विविध प्रकारचे ४० हून अधिक चित्ररथ सहभागी होणार असून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, पर्यावरण क्षेत्रातील सुमारे ८० संस्था सहभागी होणार आहेत. यावर्षी चौदा ढोल पथकांना चौकांमध्ये ढोल वादनास परवानगी देण्यात आली आहे. संस्कार भारतीतर्फे महारांगोळी काढण्यात येणार आहे. संस्थेच्या अध्यक्षा अलका मुतालिक, विश्वस्त मंडळ आणि प्रमुख यात्रा संयोजक अमेय काटदरे यांनी स्वागतयात्रेची संपूर्ण नियोजन केले असून नेहमीप्रमाणे गुढीपाडव्याला बाप्पाच्या पालखीसह भव्य यात्रा होईल, अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली. ३० मार्च ते ६ एप्रिल दरम्यान राम नाम जपयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

### जल दिनानिमित्त प्रभात फेरीचे आयोजन

**नवी मुंबई** : सिडको महामंडळाच्या पाणीपुरवठा विभागातर्फे जागतिक जल दिनानिमित्त सोमवारी नवीन पनवेल सेक्टर-१ एस येथील सिडको पाणीपुरवठा कार्यालय ते सेक्टर-१८ मधील बांठिया माध्यमिक विद्यालयादरम्यान प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीद्वारे नागरिकांना पाण्याचे महत्त्व पटवून देण्यासह पाणी बचतीचा संदेश देण्यात आला. सिडकोच्या नवीन पनवेल येथील पाणीपुरवठा कार्यालय येथे प्रभात फेरीचा प्रारंभ होऊन बांठिया विद्यालय येथे समारोप करण्यात आला. प्रभात फेरीमध्ये बांठिया विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व लेझीम पथकाने सहभाग घेतला.

### कल्याणमध्ये लोक अदालतीचे आयोजन

**कल्याण** : तालुकास्तरावर २२ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कल्याण व भांडुप परिमंडळातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित तसेच वीजचोरीची दाखलपूर्व व प्रलंबित अशी ५ हजार ९२७ प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. महावितरणच्या उपलब्ध सवलतीचा लाभ घेत संबंधित ग्राहकांनी ७ कोटी ८६ लाख रुपयांचा भरणा केला. कल्याण परिमंडळांतर्गत ५ हजार ६१८ प्रकरणांमध्ये तडजोड होऊ शकली व ७ कोटी ५२ लाख रुपयांचा भरणा झाला. तर भांडुप परिमंडलांतर्गत ३३ लाख ३२ हजार रुपयांचा भरणा करणाऱ्या ३०९ ग्राहकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

### डॉ. अमर द्विवेदी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई** : भारतीय आयुर्वेद महासंमेलनाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने २३ मार्च रोजी मीरारोड येथे अखिल राष्ट्रीय परिसंवाद आयुर्बोध-२५चे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाच्या उद्घाटन सत्रात नेरूळ येथील डी. वाय. पाटील विद्यापीठाचे उपप्राचार्य आणि सर्जन डॉ. अमर द्विवेदी लिखित आयुर्वेद अँड बेसिक फ्रॅक्चर मॅनेजमेंट या पुस्तकाचे प्रकाशन भारतीय राष्ट्रीय चिकित्सा आयोगाचे अध्यक्ष डॉ. राकेश शर्मा आणि प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. रामदास आव्हाड यांच्या हस्ते संपन्न झाले.

# सिडको सोडतधारकांचा वाढीव किमतींविरोधात एल्गार

## २६ हजार घरांच्या किमती कमी करण्यासाठी मनसे आक्रमक

**नवी मुंबई** : ऑक्टोबर २०२४ मध्ये सिडकोने नवी मुंबई परिसरात २६ हजार घरांची लॉटरी जाहीर केली. जाहिरातीत ही घरे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत असल्याचे सांगून घरांच्या किमती सर्व सामान्यांच्या आवाक्याबाहेर ठेवल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सिडकोच्या या मनमानी कारभाराविरोला विरोध करत मनसे प्रवक्ते व नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांच्या नेतृत्त्वाखाली मंगळवारी वाशी येथे मानवी साखळी आंदोलन करण्यात आले. हजारोंच्या संख्येने सिडको सोडतधारक मानवी साखळी आंदोलनात सहभागी झाले होते.



छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अरेंजा कॉर्नर असा पायी मोर्चा काढण्यात आला. नंतर अरेंजा कॉर्नर येथे सिडको सोडतधारकांनी भव्य मानवी साखळी उभी करून सिडकोचा निषेध केला. सिडकोने दर जाहीर करण्यापूर्वी १ लाख ५२ हजार अर्ज दाखल झाले असता दर जाहीर झाल्यानंतर फक्त २२ हजार अर्ज उरलेत. त्यातील पण जवळपास ६-७ हजार सोडतधारकांना घरे जबरदस्ती माथी मारली जात आहेत. सिडकोने ७०० कोटी खर्च करून ज्या मार्केटिंग कंपनीशी करार केला होता, ते पैसे घरांच्या किमती कमी करण्यासाठी वापरले असते, तर गोरगरीबांचे आशीर्वाद मिळाले असते, अशी भावना सिडको सोडतधारकांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे सिडकोने जाहिरात करताना ३२२ चौ.फुटाचे घर सांगून प्रत्यक्षात २९० चौ.फुटाचे घर देऊन सर्वसामान्य सिडको सोडतधारकांची फसवणूक केली आहे. सिडकोने या घरांचे दर ठरवताना अनेक पातळ्यांवर सर्वसामान्यांची व केंद्र सरकारची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला. केंद्र सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये पंतप्रधान आवास योजनेची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. त्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची उत्पन्न मर्यादा ३ लाखांपेक्षा कमी तर अल्प उत्पन्न गट या घटकाची मर्यादा ३ लाख ते ६ लाख असायला हवी. हे नियम नरेंद्र मोदींच्या गुजरातमधील अहमदाबादमध्ये पाळले जातात, मग नवी मुंबई याला अपवाद का? त्याचप्रमाणे विधानसभा निवडणुकीपूर्वी सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांनी आश्वासन दिले होते, की घरांच्या किमती २०% ते २५% नी कमी होतील. या घोषणेचा ही मंत्री महोदयांना विसर पडल्याचे दिसून येते. कुर्लामध्ये म्हाडा जवळपास ५०० चौ.फुटाचे घर ५० लाखाला देत असताना सिडको नवी मुंबईत ३०० चौ.फुटाचे घर ८० लाखाला का देत आहे? असा सवाल उपस्थित करत ही सर्व सामान्यांची घोर फसवणूक आहे, असा आरोप गजानन काळे यांनी सिडको प्रशासनावर केला. या मोर्चात मनसे उपशहर अध्यक्ष सविनय म्हात्रे, शहर सचिव विलास घोणे, सचिन कदम, महिला सेना शहर अध्यक्ष डॉ. आरती धुमाळ व सिडको सोडतधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सिडको भवनवर 'इंजेक्शन मोर्चा'चा इशारा

पुढील निर्णय होईपर्यंत सिडकोने पैसे भरायची प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी सुद्धा या आंदोलनावेळी सिडको प्रशासनाला करण्यात आली. येत्या काही दिवसांत सिडको प्रशासनाला सोडतधारकांतर्फे पोस्ट कार्ड पाठवण्याची मोहीम सुरू करणार तसेच आवश्यकता पडल्यास सिडको सोडतधारक 'जेल भरो' आंदोलन करतील, अशी माहिती गजानन काळे यांनी दिली. या मोहिमेत सिडको सोडतधारक आपल्या भावना प्रशासन व सरकारला कळवतील. तसेच येत्या काही दिवसांत जर घरांचे दर कमी नाही झाले तर सिडको भवनवर भव्य 'इंजेक्शन मोर्चा' काढण्यात येईल, अशी घोषणा गजानन काळे यांनी केली.

# नियम धाब्यावर बसवून घोडबंदरमध्ये नाले उभारणी

## नव्या प्रकल्पांना परवानगी देण्यासाठी अधिकाऱ्यांमध्ये चुरस

**ठाणे** : घोडबंदर पट्ट्यात मोठ्या विकासकांच्या गृह प्रकल्पांची कामे सुरू असून या गृह प्रकल्पांना लागूनच नाले उभारणीच्या परवानग्या देण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे या परवानग्या देण्यासाठी ठाणे महापालिकेच्या अभियंत्यांमध्ये चुरस पाहायला मिळत आहे. पालिकेच्याच एका उपअभियंत्याने माहिती देताना कार्यक्षेत्राच्या बाहेर असलेल्या अभियंत्याने तब्बल २१ पेक्षा जास्त विकासकांना या परवानग्या दिल्या असल्याची तक्रार या उप अभियंत्यांच्या वतीने करण्यात आली असल्याने ठाणे महापालिकेचे नेमके चाललेय काय? असा प्रश्न समोर आला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील नाल्यांची बांधणी करणे, विकास प्रस्तावांना ना-हरकत तसेच पूर्णत्वाचा दाखला देणे, अशी कामे मलनिस्सारण विभागामार्फत करण्यात येतात. या कामांसाठी ठाणे महापालिकेने प्रभाग समितीनिहाय अभियंत्यांची नेमणूक केली आहे. त्यांच्याकडे बिल्डरांचे विकास प्रस्ताव दाखल झाल्यानंतर अटी व शर्तीची पूर्तता केली आहे की नाही, याची पाहणी करूनच ना-हरकत तसेच पूर्णत्वाचा दाखला देण्याची जबाबदारी असते. घोडबंदर विभागासाठी एका उप अभियंत्याची यापूर्वीच नियुक्ती करण्यात आली आहे. यासंबंधीच्या परवानग्या या अभियंत्यांच्या देखरेखीखाली पहिल्या टप्प्यात दिल्या जाव्यात, अशी कामकाजाची पद्धत आहे. असे असताना घोडबंदर भागातील बड्या बिल्डरांना परवानग्या तसेच ना-हरकत दाखले देताना नियमांची पायमल्ली केली गेल्याची तक्रार या उप अभियंत्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली असून पावसाळ्यात पूरस्थितीसारखे प्रकार यामुळे घडू शकतात, अशी भीती या उप अभियंत्याने पत्राद्वारे उपस्थित केली आहे.

घोडबंदर भागात रस्ते आणि खाडीलगतच्या भागापर्यंत अनेक कच्चे नाले असून या भागात मोठ्या प्रमाणात गृहसंकुलांचे प्रकल्प सुरू आहेत. यामुळे नाल्यांमध्ये बेकायदा भरणी करून नाल्याची रुंदी कमी करणे, नाल्याचे प्रवाह वळविणे असे प्रकार सुरू आहेत. असे प्रकार रोखण्यासाठी नाल्यांची आरसीसी पद्धतीने बांधणी करण्यासाठी ७५ कोटींचा निधी उपलब्ध करून त्या कामांचे कार्यादेश यापूर्वीच देण्यात आले आहेत. हे कार्यादेश देताना नियमांची मोडतोड करण्यात आल्याची तक्रार करण्यात आली आहे.


### २१ बिल्डरांच्या विकास प्रस्तावांना एनओसी



घोडबंदर भागात बिल्डरांकडून दाखल झालेल्या विकास प्रस्तावांना ना-हरकत आणि पूर्णत्वाचे दाखले देताना महापालिकेची कार्यपद्धतीला हरताळ फासण्याचे काम करण्यात आले असल्याचे या उप अभियंत्यांचे म्हणणे आहे. घोडबंदर भागात जो उप अभियंता कार्यरत आहे, त्याने येथील सहा गृहप्रकल्पांना परवानगी दिली आहे. असे असताना मलनिस्सारण विभागात कार्यरत असणाऱ्या एक कार्यकारी अभियंता आणि या परिसराचा कार्यभार ज्या उप अभियंत्याकडे नाही, अशा दोघा अभियंत्यांनी २१ बिल्डरांच्या विकास प्रस्तावांना परस्पर ना हरकत दाखले दिल्याची तक्रार शहर अभियंता यांच्याकडे करण्यात आली आहे.

# डहाणूतील भाताच्या गोदामाला भीषण आग

**पालघर** : डहाणू तालुक्यातील घोल येथे असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ लिमिटेडच्या भात खरेदी केंद्रात मंगळवारी पहाटे भीषण आग लागली. या गोदामात सुमारे ३२४० क्विंटल भाताचा साठा करण्यात आला होता. घटनेची माहिती मिळताच अदानी डहाणू थर्मल अग्निशमन दलाच्या पथकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू केले.



तब्बल पाच तासांच्या अथक प्रयत्नानंतर मंगळवारी आग आटोक्यात आणण्यात अदानी डहाणू थर्मल अग्निशमन केंद्राला यश आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तातडीने तीन अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाले होते. या कठीण परिस्थितीतही अदानी डहाणू थर्मल अग्निशमन दलाने दाखवलेल्या तत्परतेमुळे आगीचा फैलाव रोखण्यात आणि मोठे नुकसान टाळण्यात यश आले. स्थानिक प्रशासनाने अग्निशमन दलाच्या परिश्रमांचे आणि तत्परतेचे कौतुक केले आहे. सदर घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अधिक तपास सुरू असून, प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि गोदामांमध्ये सुरक्षिततेच्या उपाययोजना काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन केले आहे.

# वालधुनी नदीतून २०० मेट्रिक टन कचरा हटवला

**उल्हासनगर** : उल्हासनगर शहराला वळसा घालणारी वालधुनी नदी गेल्या काही वर्षांपासून प्रदूषण आणि दुर्गंधीचा मुख्य स्रोत बनली होती. मात्र आता या नदीच्या स्वच्छतेसाठी उल्हासनगर महापालिका 'मिशन मोड'वर उतरली असून आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या पुढाकाराने व ठोस निर्णयामुळे नदीचे रूप पालटू लागले आहे. नदीपात्रातून जवळपास २०० मेट्रिक टन कचरा हटवून महापालिकेने नागरिकांचा विश्वास पुन्हा जिंकण्यास सुरुवात केली आहे.



या पार्श्वभूमीवर उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी परिस्थितीची गंभीर दखल घेत सार्वजनिक आरोग्य विभागाला नदीपात्राच्या स्वच्छतेच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यानुसार ८ मार्चपासून वडोलगांव ते राजीवगांधी नगर आणि छत्रपती शाहू महाराज उड्डाणपुलाच्या दरम्यान पोकलेन मशीन व इतर यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने व्यापक स्वरूपात नदीची साफसफाई करण्यात आली.

> वालधुनी नदीची स्वच्छता ही फक्त स्वच्छतेची मोहीम नसून पर्यावरण व आरोग्य रक्षणाचा एक प्रयत्न आहे. नागरिकांनी देखील नदीत कचरा टाकू नये, आपला कचरा घंटागाडीतच द्यावा आणि शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे, हीच अपेक्षा आहे.
>
> **मनीषा आव्हाळे**, (आयुक्त, उल्हासनगर महापालिका)

या मोहिमेदरम्यान सुमारे २०० मेट्रिक टन गाळ, प्लास्टिक व अन्य कचरा नदीतून बाहेर काढण्यात आला. ही मोहीम केवळ एक टप्पा असून, राजीवगांधी नगर ते उल्हास स्टेशन या दुसऱ्या टप्प्याचे काम सध्या प्रगतिपथावर आहे.

# क्षयरोग मुक्त ग्राम पंचायत कार्यक्रमा अंतर्गत सलग दोन वर्षी पात्र ठरल्या सिल्लोड तालुक्यातील 3 ग्रामपंचायत मा. जिल्हा अधिकारी यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** दिनांक 24 मार्च हा जागतिक क्षयरोग दिवस म्हणून जगभर साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात क्षयरोग मुक्त ग्राम पंचायत कार्यक्रमा अंतर्गत सलग दोन वर्षी पात्र ठरलेल्या ग्रामपंचायत पिंपळगाव पेठ, केऱ्हाळा व बाभूळगाव बुद्रुक यांचा सत्कार मा. जिल्हा अधिकारी यांच्या हस्ते दिनांक 24 मार्च 2025 रोजी नियोजन समिती सभागृह , जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर . येथे करण्यात आला. माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर, जिल्हा आरोग्य अधिकारी अभय धानोरकर, माननीय गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार, तालुका आरोग्य अधिकारी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय सिल्लोड डॉ. नासेर पठाण, वैद्यकीय अधिकारी पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट काम केल्याबद्दल माननीय जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर दिलीप स्वामी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर श्री अंकित पन्नू ग्रामपंचायत पिंपळगाव पेठ ग्रामपंचायत अधिकारी इसामोद्दीन महबूब शेख, सरपंच दिलीप जाधव, ग्रामपंचायत केऱ्हाळा, बाभूळगाव बुद्रुक ग्रामपंचायत अधिकारी अर्चना पाटील गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड श्री रत्नाकर पगार यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी सिल्लोड डॉक्टर नासेर पठाण व वैद्यकीय अधिकारी श्री पटेल हे उपस्थित होते







**६१ लाभार्थ्यांचे अर्ज मागे ; आयटीआर भरणाऱ्यांना योजनेतून वगळणार, लाभार्थ्यांना २**

# रायगडमधील १५ हजार लाडक्या बहिणी

**धनंजय कवठेकर/रायगड**
राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यास महाराष्ट्र शासनाने २८ जून २०२४ रोजी मान्यता दिली. या योजनेमार्फत महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दर महिना दीड हजार असा आर्थिक लाभ देण्यात येत आहे.



रायगड जिल्ह्यात जवळपास ६ लाख ३३२ लाडक्या बहिणींना या योजनेत लाभ देण्यात येत आहे. योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून आतापर्यंत जिल्ह्यात १५ हजार ८४९ अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत तर ६१ बहिणींनी स्वतःहून आपले अर्ज मागे घेतले आहे. मध्यंतरी या योजनेत ज्या महिला पात्र नाहीत, त्यांचा हप्ता रोखण्यात येणार असल्याचे सांगितले जात होते. तर काहींकडून वसुली केली जाणार असल्याचेही सांगितले जात होते. त्यामुळे काही महिलांनी स्वतःहून ही रक्कम न मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तर काहींचे अर्ज आधीच रिजेक्ट झाले आहेत.

### वाढीव हप्ता मिळण्याची आशा धुसर

सध्या महिलांना दीड हजार रुपये हफ्ता दिला जात आहे. यासाठी आतापर्यंत राज्य सरकारने ४६ हजार कोटींची तरतूद केली होती. सध्या राज्यावर खर्चाचा बोजा वाढला आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेच्या रकमेत वाढ होणार नाही, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. यामुळे लाडकी बहीण योजनेचा वाढीव हप्ता मिळण्याची आशा धुसर झाली आहे.